# दूधसाखर महाविद्यालय, बि

ता. कागल, जि. कोल्हापूर



# स्पंदन

२००४-०५

# दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री(मौनीनगर)

ता. कागल, जि. कोल्हापूर संचलित



दूधसाखर महाविद्यालय
(कला व विज्ञान)

दूधसाखर माध्यमिक व
उच्च माध्यमिक विद्यालय
(कला व विज्ञान व्यावसायिक व
सैनिक शाळा प्रवेश तयारी वर्ग)





दूधसाखर विद्यानिकेतन
(प्राथमिक विभाग)

## ठळक वैशिष्ट्ये

- विविध शैक्षणिक शाखांसाठी भव्य व सुसज्ज इमारती
- शिक्षण, कला क्रीडा व संस्कारासाठी विशेष लक्ष
- शांत व निसर्गरम्य परिसर
- उच्च गुणवत्ता प्राप्त शिक्षक वर्ग
- अद्यावत ग्रंथालय, सुसज्ज प्रयोगशाळा
- भव्य क्रीडांगण व अभ्यासिकेची स्वतंत्र सोय

संस्था मार्गदर्शक



माजी आमदार नामदेवरावजी भोईटेसो

श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री (मौनीनगर) संचलित

# दूधसाखर महाविद्यालय, बिद्री

# स्पंदन

## वार्षिक अंक बारावा

## सन २००४-२००५


### संपादक मंडळ

**संपादक**

प्रा. एस. आर. पाटील

**विभागीय संपादक**

| | |
|---|---|
| डॉ. एस. डी. पाटील | मराठी |
| डॉ. एस. बी. देसाई | हिंदी |
| प्रा. डी. एन. पाटील | इंग्रजी |
| प्रा. एम. व्ही. टाकळे | शास्त्र |

## दि प्रेस ॲंड रजिस्ट्रेशन ऑफ बुक्स ॲक्ट नियम ८, फॉर्म नं. ४ प्रमाणे आवश्यक असलेली माहिती

# स्पंदन

- प्रकाशन स्थळ : दूधसाखर महाविद्यालय, बिद्री. ता. कागल, जि. कोल्हापूर.
- प्रकाशनाचा काळ : वार्षिक
- प्रकाशकाचे नाव : मा. प्रभारी प्राचार्य प्रा. एन. डी. पाटील
- राष्ट्रीयत्व : भारतीय
- पत्ता : दूधसाखर महाविद्यालय, बिद्री. ता. कागल, जि. कोल्हापूर.
- संपादक : प्रा. एस. आर. पाटील
- राष्ट्रीयत्व : भारतीय
- पत्ता : दूधसाखर महाविद्यालय, बिद्री. ता. कागल, जि. कोल्हापूर.
- मुद्रकाचे नाव : श्री. गणपतराव धोंडीबा शिंदे
  जोतिर्लींग ऑफसेट, गारगोटी.
- राष्ट्रीयत्व : भारतीय
- पत्ता : मु. पो. गारगोटी. ता. भुदरगड, जि. कोल्हापूर. ☎ : २२०५१९
- छाया : रमेश फोटो व गंगा डिजीटल फोटो, बिद्री.
- अक्षर जुळणी : आशादिप कॉम्प्युटर (दिपक शिंदे)
- पत्ता : मु. पो. गारगोटी. ता. भुदरगड, जि. कोल्हापूर. ☎ : २२०५१९
- मुखपृष्ठ : आशादिप कॉम्प्युटर, गारगोटी.

मी असे जाहीर करतो की वरील माहिती माझ्या समजुतीप्रमाणे बरोबर आहे.

प्रा. एन. डी. पाटील
प्रभारी प्राचार्य



**या अंकातील कवी व लेखकांच्या मताशी प्रकाशक व संपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही.**

*(फक्त खाजगी वितरणासाठी)*

## संपादकीय....

स्पदंन वार्षिकांक विद्यार्थ्यावर्गाच्या हाती देताना अपार आनंद होत आहे.

२००४-०५ हे वर्ष मानवी जीवनाला अनेक प्रकारचे चटके देऊन गेले सुनामी लाटानी मानवी जीवनावर केलेला प्रचंड आघात अतीव दु:ख देणारा होता. गेल्या अनेक शतकांमधला हा एक प्रचंड तडाखा सावरता - सावरता मानवी जीवनाला वृध्दापकाळ प्राप्त होतो की काय अशी भिती वाटू लागली. क्षणभरात मृत्यूने घातलेले थैमान आणखी त्याची ती कित्येक दिवस रेंगाळलेली छाया, आज जरी आठवली तरी अंगावर काटा उभा रहातो.

निसर्गानि मानवावर नेहमीच विजय मिळवलेला आहे. मात्र निसर्ग मानवा इतका क्रूर नाही. मानवाने केलेली मानवाची अवहेलना पाहून कवयित्री बहिणाबाई चौधरींच्या खालील ओळींचे स्मरण होते.

*''आरं माणसा माणसा*
*कधी व्हशील माणूस....*
*तुझ्यापेक्षा बरं*
*गोठ्यातलं जनावरं''*

मानव किती नीच व क्रूर पातळीवर उतरु शकतो याचे उदाहरण म्हणजे अतिरेक्यांनी भारतीय संसदेवर कार बॉम्ब स्फोट करण्याचा केलेला प्रयत्न काळजाच्या ठिकऱ्या उडवणारा तो प्रसंग व त्याची स्मृति आजही जीवनाचा थरकाप उडवते.

''नरेंचि केला हीन किती नर'' ही लाजिरवाणी गोष्ट टाळावयाची असेल तर नव्या मनूचा उदय होणे क्रमप्राप्त नव्हे तर अत्यावश्यक आहे. या विशाल विश्वात मानवाची माणूसकी जिवंत ठेवायची असेल तर मानवी मन विशाल बनवले पाहिजे, विकसित केले पाहिजे. या विकास कार्यात लहान-थोर, दीन-दलित, गरीब-श्रीमंत या सर्वांनी सक्रिय सहभाग घेतला पाहिजे. आपल्याला जमते आणि झेपते ते करावयाला पाहिजे. या उद्देशाने स्पंदन वार्षिकाच्या संपादनाकडे आम्ही पहात आहोत. प्रयत्न चिमुकला असेल पण यातून मिळणारी प्रेरणा गगनाला गवसणी घालणारी असेल.

या वार्षिकाची आंतरबाह्य बांधणी त्याचउद्देशाने केलेली आहे. यातील साहित्य त्याच प्रेरणेने निवडलेले आहे. **शैलेश देसाई** यांचे वास्तववादी जीवनाची दाहकता प्रखरपणे व्यक्त करणारे मृखपृष्ठ अंकाला साजेसे आहे.

या वार्षिकाची आंतरबाह्य सजावट करण्यासाठी संपादक मंडळाने **प्रा. एम. व्ही. टाकळे, डॉ. एस. बी. देसाई, डॉ. एस. डी. पाटील, प्रा. डी. एन. पाटील** यांनी परिश्रम घेतले. विद्यार्थी वर्गाने आपल्या लिखानाने वार्षिकाला चांगले स्वरुप देण्याचा मनापासून प्रयत्न केल्यावद्दल त्यांचे विशेष आभार

या कॉलेजचे प्र. प्राचार्य एन. डी. पाटील यांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाने महाविद्यालयाची यशस्वी वाटचाल चालू आहे. स्पंदन अंक त्यांच्याच मार्गदर्शनाचे प्रतीक आहे.

या वार्षिकाचे संपादन करण्यासाठी महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी यांचे विशेष सहकार्य लाभले. या बद्दल त्यांचा ऋणी आहे. जीवनाच्या अंधारलेल्या काळामध्ये सुरेश भटांच्या खालील ओळी मांनवी जीवनामध्ये क्रांती घडवतील अशी आशा वाटते.

*''उष:काल होता होता काळरात्र झाली*
*अरे पुन्हा आयुष्याच्या पेटवा मशाली''*

प्रमुख संपादक

प्रा. एस. आर. पाटील

## ⁕ व्यवस्थापन समिती ⁕

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | : | मा. आमदार कृष्णराव परशराम पाटील |
| उपाध्यक्ष | : | मा. गणपती गुंडू फराकटे |
| सदस्य | : | मा. नामदेवराव शंकरराव भोईटे |
| सदस्य | : | मा. जी. डी. पाटील |
| सदस्य | : | मा. एकनाथ माणकोजी निकम |
| सचिव | : | मा. एस्. एस्. चौगले |
| सेक्रेटरी | : | प्र. प्राचार्य मा. एन्. डी. पाटील |
| शिक्षक प्रतिनिधी | : | मा. नंदकुमार धोंडी पाटील |
| शिक्षक प्रतिनिधी | : | मा. यशवंत सिताराम पाटील |
| शिक्षक प्रतिनिधी | : | मा. हरीदास दत्तू धायगुडे |
| शिक्षकेत्तर प्रतिनिधी | : | मा. महादेव कृष्णा भोईटे |


हार्दिक शुभेच्छा!

सभासद हित हेच आमचे ब्रिद

श्री. दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ सेवकांची सहकारी पत संस्था, बिद्री. (मौनीनगर)

आकर्षक व्याजदर, तत्पर सेवा

दिनांक ३१/१/२००५ अखेर सांपत्तीक स्थिती.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अधिकृत भाग भांडवल | - | २०.०० लाख | वसुल भाग भांडवल | - | १०.६८ लाख |
| फंडस् | - | ०१.३३ लाख | रोख व बँक शिल्लक | - | ००.३९ लाख |
| ठेवी | - | ३३.९३ लाख | कर्जे | - | ४८.०० लाख |
| ढोबळ नफा | - | ०३.५६ लाख | गुंतवणूक | - | ०१.१८ लाख |
| मालमत्ता | - | ००.२५ लाख | खेळते भांडवल | - | ४९.८८ लाख |

चेअरमन, व्हा. चेअरमन, संचालक मंडळ,
मॅनेजर व सर्व सभासद

# संस्था पदाधिकारी (२३ जानेवारी २००५ अखेर)



चेअरमन : मा. दिनकररावजी भाऊसो जाधव



व्हा.चेअरमन : मा. बाबासाहेब हिंदूराव पाटील



श्री. विजयसिंह कृ. मोरे



श्री. प्रविणसिंह वि पाटील



श्री. बापुसाहेब य. भोसले



श्री. नंदकुमार बा. सुर्यवंशी



श्री. सुरेशराव द सुर्यवंशी



श्री मारूती गो. फराकटे

# संस्था पदाधिकारी


श्री. प्रकाश आ देसाई


श्री धनाजीराव रा देसाई


श्री दत्तात्रय म उगले


श्री कृष्णात बंडू पाटील


श्री दिनकर श्री आवदार


श्री दिनकर सं. कांबळे


श्री पंडीतराव द केणे


श्री मारूतीराव वं. सावडकर


सौ लिलाबाई दि पाटील


सौ गीता के चौगले


श्री वाय एस पाटील
कामगार प्रतिनीधी


श्री सर्जेराव ई देसाई
कामगार प्रतिनीधी

# संस्था पदाधिकारी (२४ जानेवारी २००५ पासून)



चेअरमन
मा.आमदार के.पी. पाटीलसो



व्हा.चेअरमन
मा. गणपतराव गुंडू फराकटे

## संस्था पदाधिकारी



श्री विठ्ठलराव खोराटे



श्री केरबा द पाटील



श्री गणपती ज्ञा पाटील



श्री. नेताजी कु. पाटील



श्री सुनिलराज सु सुर्यवंशी



श्री वंडोपंत कु. पाटील



श्री बाजीराव ई गोधडे



श्री. पंडीतराव द. केणे

# संस्था पदाधिकारी



श्री केरवा गो. नांदेकर



श्री दिनकरराव भा. जाधव



श्री शशिकांत आ. पाटील



श्री राजेंद्र पां पाटील



श्री सुनिलराव शि कांवळे



श्री केशवराव श पाटील



सौ. सविता भि एकल



सौ सुवर्णा सं. पाटील



श्री रमेश मा वारके



श्री मधुकर गो. जाधव



श्री ए. वाय पाटील
संचालक बँक प्रतिनिधी

# विद्यार्थी संसद

## २००४-२००५



प्र प्राचार्य एन् डी पाटील,
जिमखाना चेअरमन व
क्रीडा प्रतिनिधी



प्रा. डी. के. शिंदे
एन् एस एस प्रतिनिधी



प्रा वाय एस पाटील
प्राध्यापक प्रतिनिधी



मयुर पाटील
विद्यापीठ सचिव, बी एस्सी २



कु. पाटील स्मिता आनंदराव
वर्ग प्रतिनीधी बी. ए. १



कु. साठे वैशाली तानाजी
वर्ग प्रतिनिधी बी. ए. २



कु. पाटील अमृता दिनकर
वर्ग प्रतिनिधी बी. ए. ३



चांदम दत्तात्रय रामचंद्र
वर्ग प्रतिनिधी, बी. एस्सी . ३



शिंदे प्रशांत पांडूरंग
वर्ग प्रतिनिधी,बी. एस्सी . ३



कु. डवरी दिपक काशीनाथ
एन एस एस प्रतिनिधी,बी. एस्सी . ३



कु. मांडवकर सुमन केरबा
सांस्कृतिक प्रतिनिधी, बी. एस्सी . ३



कु. वुरूड दिपाली सदाशिव
विद्यार्थीनी प्रतिनिधी, बी. एस्सी . ३



कु. पाटील माधुरी मधुकर
विद्यार्थीनी प्रतिनिधी, बी. ए. २



मा.आर. डी. देसाई सो
कार्यकारी संचालक बिद्री कारखाना
मानद सचिव, श्री. दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री



मा.शामराव शिवाजी चौगले सो
मानद सचिव, श्री. दूधसाखर शिक्षण प्रसारक
मंडळ बिद्री



मा. एन. डी. पाटील
प्र. प्राचार्य, दूधसाखर महाविद्यालय, बिद्री
५ एप्रिल २००५ अखेर



मा.सी.वाय. जाधव
प्र. प्राचार्य, दूधसाखर महाविद्यालय, बिद्री
६ एप्रिल २००५ पासून



डॉ. एस.डी. पाटील, डॉ.एस.बी. देसाई, प्रा.एस.आर. पाटील, प्रा.डी.एन. पाटील, प्रा.एम.व्ही. टाकळे

संपादक मंडळ

# मराठी विभाग



''माझी मराठी असे मायभाषा
हिच्या कीर्तिचे तेज लोकी चढे
गोडी न राहे सुधेमाजि आला,
पळाली सुधा स्वर्गलोकाकडे ॥''
– ना. गो. नांदापूरकर

● विभागीय संपादक :

**प्रा. डॉ. संजय पाटील**

## गद्य विभाग


| | | | |
|---|---|---|---|
| १) | राष्ट्रीय एकात्मता : आजची गरज | दिपक पाटील | ७ |
| २) | एक महर्षितुल्य व्यक्तीमत्व : डॉ. मनमोहन सिंग | पंकजशिल पाटील | ९ |
| ३) | बाप | अमोल खोत | ११ |
| ४) | तोच सुदिन असेल | सुशांत कपले | १२ |
| ५) | संस्कार (चिंतानिका) | सचिन जाधव | १४ |
| ६) | ऋणानुबंध | अनिता पोवार | १५ |
| ७) | महाविद्यालयाचा रक्षण कर्ता | व्ही. बी. शिंदे | १६ |
| ८) | श्रध्दाची अधुरी कहाणी | अर्चना पोवार | १८ |
| ९) | अपयश आले तर हेटाळणी केली जाऊ नये | राजाराम कांबळे | २० |
| १०) | प्रगतीचे चिन्ह आहे : परिवर्तन | प्रकाश पोतदार | २१ |
| ११) | मैत्री | विकास पाटील | २२ |


## पद्य विभाग


| | | | |
|---|---|---|---|
| १) | माझी शाळा – | ज्ञानदेव कवडे | २३ |
| २) | स्वरुप – | मंगेश धुरी | २३ |
| ३) | साक्षरता – | सुहास कांबळे | २४ |
| ४) | जीवनसाथी – | अमोल खोत | २४ |
| ५) | धडपड – | संदीप पाटील | २४ |
| ६) | वेसन म्हणजे मृत्यू – | सचिन हात्रोटे | २५ |
| ७) | मी ही मंत्री झालो – | अर्चना माने | २५ |
| ८) | अखेर जातीपातीचा – | दिपक आळवेकर | २६ |
| ९) | मैत्री – | सविता पाटील | २६ |
| १०) | मैत्री आपली – | अविनाश तराळ | २६ |
| ११) | प्रेमाची गोडी – | बाळासो कांबळे | २७ |
| १२) | शब्द – | सतिश पावले | २७ |
| १३) | जीवनाचा सूर्यास्त – | ओंकार घोरपडे | २७ |
| १४) | नात – | कु. कांचन नाईक | २७ |
| १५) | अशीच ती एकदा – | युवराज गायकवाड | २८ |
| १६) | प्रेम कुणावर करावे – | राहूल पाटील | २८ |
| १७) | नोकरी – | किरणजीत घराळ | २८ |
| १८) | निरोप – | कु. सोनम ढेकळे | २९ |
| १९) | कविता – | संदीप फराकटे | २९ |
| २०) | जीवन कसे जगावे – | कुलदीप खोत | २९ |
| २१) | २१ व्या शतकात – | संभाजी मोरे | २९ |
| २२) | मी सांगतो – | संदीप पाटील | ३० |
| २३) | अंत यात्रेतील खंत – | संदीप सुतार | ३० |
| २४) | सांग प्रिये मी पास कस व्हायच | राज पंदारे | ३१ |
| २५) | हे असच चालायच – | अनिल रानमाळे | ३१ |
| २६) | कुणीतरी – | सागर दाभाडे | ३२ |
| २७) | मन – | प्रदीप वाईंगडे | ३२ |
| २८) | प्रतिज्ञा | कु.वैशाली चव्हाण | ३२ |
| २९) | डॉ. आंबेडकर | कु. सविता कांबळे | ३३ |
| ३०) | शिक्षक | प्रकाश पाटील | ३३ |
| ३१) | अर्थसाद – | अरुण पाटील | ३४ |
| ३२) | विरोधी कल्पना – | सुनिता तामोत | ३४ |
| ३३) | मी – | नितिन मगदूम | ३५ |
| ३४) | कठीण शब्दाचे अर्थ – | अंकूश निकाडे | ३५ |
| ३५) | प्रेम – | अवधूत किल्लेदार | ३५ |
| ३६) | घाव – | अतूल भाकरे | ३६ |
| ३७) | बा पिवून आला तेंव्हा – | सागर वंजारे | ३६ |
| ३८) | जीवनाचा अंत – | दत्तात्रय पाटील | ३६ |
| ३९) | चारोळ्या – | दयानंद फराकटे | ३६ |

# राष्ट्रीय एकात्मता : आजची गरज

'बलसागर भारत होवो', विश्वात शोभूनी राहो.'

'हम सब एक है ।'

अशी काही देशभक्तीपर गीते व घोषवाक्ये आजच्या मुलांच्या, युवकांच्या ओठांवर तरळत राहतात. जर आपला भारत देश विश्वात शोभून दिसावा, हिंदू-मुस्लिम, शिख-ईसाई हे सर्वजण एक रहावेत, अशी जर इच्छा असेल तर देशभक्तीपर गीतांचे व घोषवाक्यांचे कृतीत उत्तर द्यायला हवे. याकरिता गरज आहे, ती 'राष्ट्रीय एकात्मतेची' सर्वांनी संघटित राहण्याची.

आज प्रत्येक शाळेमधून दैनंदिन कामकाजाचा प्रारंभ, प्रार्थना आणि प्रतिज्ञेने होतो. हे आपण सर्वत्र पाहतो. शाळा-शाळांमधून असंख्य विद्यार्थी 'भारत माझा देश आहे, सारे भारतीय माझे बांधव आहेत.' ही प्रतिज्ञा म्हणत असतात. आता या प्रतिज्ञेला फक्त अर्थ उरलाय असं मला वाटतं. अत्यंत मौलिक अशा या विचाराचा दररोज आपण उच्चार करीत असतो हे खरं, तथापि आचार मात्र त्याहून वेगळा असतो.

जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात आम्ही आज फक्त आमचाच विचार करीत आहोत. 'मी-माझं' आणि 'आम्ही-आमचं' या संकुचित विचारांच्या पलिकडे आपण कधीच जात नाही. खरं म्हणजे आपला भारत देश कितीतरी विशाल आहे. त्यात अनेक जाती-धर्मांचे, अनेक भाषा बोलणारे आपलेच देशबांधव राहात आहेत. ही गोष्ट आपण सोयीस्करपणे विसरून गेलो आहोत. केवळ आपण आणि आपला स्वार्थ यांच्या पलिकडे आपणास काही दिसत नाही.

आपल्या या स्वार्थ-परायणवृत्तीतूनच मग भ्रष्टाचाराचा जन्म होतो. परदेशातून आणलेल्या चोरट्या मालामुळे तस्करवृत्ती निर्माण होते. आपला प्रांत, आपली भाषा याबद्दलच्या अभिमानातून मग खलिस्तानसारखे प्रश्न निर्माण होतात, एकीकडे सारे भारतीय माझे बांधव आहेत, असं म्हणत-म्हणत आतंकवादाचे थैमान सुरू होते, आजची ज्वलंत उदाहरणे घ्यावयाची झाल्यास नेपाळमधील भारतविरोधी आंदोलन-सुप्रसिद्ध अभिनेत्यास मोहरा बनवून नेपाळबरोबरचे भारताचे अत्यंत जुने संबंध तोडण्याचा प्रयत्न काही परकीय शक्तींनी केला, तसेच फिल्मी जगताशी असणारे माफियांचे संबंध, खंडणी वसुली प्रकरणातून काही प्रसिद्ध व्यक्ती व चित्रपट निर्मात्यांवर झालेले हल्ले इत्यादी.

स्वातंत्र्यपूर्वकाळात पारतंत्र्याचे जोखड झुगारून देण्यासाठी हौतात्म्य पत्करणाऱ्या

देशभक्तांनी हिंदू-मुस्लिम भेदाचा संकुचित विचार कधीच केला नव्हता. लाल-बाल-पाल हे विशिष्ट प्रांताचे नव्हे तर साऱ्या भारताचे पुढारी होते. पण देशाचे नेतृत्व करणारे आजचे पुढारी एकात्मतेच्या विरोधात हिंसेला खतपाणी घालत आहेत, शिवाय आपल्या विशिष्ट विभागावर, मतसंख्येवर डोळा ठेवून राजकीय हेतूने एकात्मतेला बाधा आणत आहेत. यासाठीच तर आपल्या भागातील रंगलेला ईदगाह मैदान वाद, रखडलेला अयोध्या प्रश्न यामुळे जातीजातीत दुरावा निर्माण होतो आहे.

कदाचित आपली जात वेगळी असेल, व्यवहार वेगळे असतील पण आपण सारे आदिमानवाचेच वंशज आहोत, म्हणूनच मानवता खरा धर्म आहे हे सर्वांनाच मानले पाहिजे. प्रत्येकाच्या चालिरिती, सण-उत्सव वेगळे असतील, पण हे सर्व आपल्या भारताचे नागरिक आहेत. आपल्या राष्ट्रभूमीचा त्या सर्वांना अभिमान आहे. भारताच्या राष्ट्रध्वजाबद्दल व राष्ट्रगीताबद्दल त्यांच्या मनात आदर आहे असे चित्र म. गांधी व पंडित जवाहरलाल नेहरू यांनी त्यावेळी सर्वांच्या मनात रंगविले होते.

दुर्दैवाने हे चित्र आज पुसट झाल्याचे दिसत आहे. व्यक्तिगत व्यवहार सोडून ज्या-ज्या वेळी आपल्या राष्ट्राचा प्रश्न समोर येईल, त्या त्या वेळी प्रांतभेद, भाषाभेद, वर्णभेद, जातीभेद सर्व बाजूला ठेवून आम्ही एकात्म झाले पाहिजे. एकेकाळी सुवर्णभूमी म्हणून मान्यता पावलेल्या आमच्या या राष्ट्राला पूर्ववैभव प्राप्त करून द्यायचं असेल तर राष्ट्रकार्यामध्ये आम्ही सारे एक आहोत, आम्हा साऱ्या भारतीयांच्या धमन्यांमधून भारतीय रक्त वाहत आहे, अशा प्रकारच्या राष्ट्रीय एकात्मतेची नितांत गरज आहे.

**– पाटील दिपक रामचंद्र**

बी.ए. (तृतीय)

## काही महत्वपूर्ण माहिती

✲ अंतराळात उपग्रह पाठविणारा भारत १३ वा देश.

✲ राकेश शर्मा हा जगातील १३८ वा भारतीय अंतराळवीर.

✲ मानवाच्या मेंदूचे वजन १३५० ग्रॅ. इतके असते.

✲ नॉर्वे देशात मध्यरात्री सूर्य उगवतो.

✲ गरमाई मासा हा पाण्यावर तरंगू शकतो व जमिनीवर चालू शकतो व हवेत सुद्धा उडू शकतो.

✲ कासव ३०० वर्षापेक्षा जास्त जगू शकतो.

✲ सूर्याचे किरण पृथ्वीवर पोहचायला ४८० सेकंदर (८ मिनट) लागतात.

✲ पृथ्वीचा स्वतःभोवती फिरण्याचा वेग २७१ कि.मी. एवढा आहे.

✲ पृथ्वीचा सूर्याभोवती परिभ्रमण करण्याचा एका मिनिटाला १७३७ कि.मी. एवढा आहे.

✲ माणसाचा आवाज एका मिनिटाला १२ मैल अंतर तोडतो.

**– संकलक**

एक ऋषितुल्य व्यक्तिमत्व

# डॉ. मनमोहनसिंग

उगवत्या २१ व्या शतकामध्ये आणि मावळत्या २० व्या शतकातील भारतीय अर्थव्यवस्थेची विस्कटलेली घडी व्यवस्थितरित्या बसवण्याचे कार्य करणारे महान अर्थतज्ञ ज्यांची गणना एका ऋषितुल्य व्यक्तिमत्वासारखी मनात प्रतिमा ठसण्यासारखी, अत्यंत विनम्र, निगर्वी स्वभाव, संयम, सात्विक वृत्ती व भूमिका ऋषितुल्य कर्मयोग्याची, नेहमीच मृदुभाषी आणि मितभाषी असे व्यक्तिमत्व समोर उभे राहते ते म्हणजे भारताचे पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग.

डॉ. मनमोहनसिंग यांचा जन्म २६ सप्टेंबर १९३२ ला पंजाबमधील गाह या खेड्यात झाला. त्यांची शैक्षणिक कारकीर्द अतिशय उच्च दर्जाची राहिली. अर्थशास्त्र हा त्यांचा प्रारंभापासूनच आवडीचा विषय होता. १९५२ मध्ये त्यांनी पंजाब विद्यापीठातून अर्थशास्त्राची पदवी प्रथम क्रमांकाने संपादन केली. १९५४ मध्ये एम. ए. अर्थशास्त्र विषयात ते विद्यापीठात पुन्हा पहिले आले. १९५६ मध्ये केंब्रिज विद्यापीठातून अर्थशास्त्र या विषयाचे शिक्षण घेत त्यांनी मानाचे 'ॲडमस्मिथ पारितोषिक' मिळवले.

मनमोहनसिंग १९७१ मध्ये प्रशासकीय सेवेत रुजू झाले. प्रारंभी परराष्ट्र खात्यातील विदेश व्यापार विभागात त्यांनी आर्थिक सल्लागार म्हणून काम केले. त्यानंतर १९७२ ते ७६ या काळात ते अर्थ मंत्रालयात मुख्य आर्थिक सल्लागार होते. त्यानंतर १९७६ ते ऑगस्ट १९८० पर्यंत नियोजन आयोगात सदस्य सचिव म्हणून काम केले. त्यानंतरची त्यांनी दोन वर्षे अणुऊर्जा आयोग वअवकाश आयोगामध्ये आर्थिक सदस्य होते. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या आर्थिक सल्लागार समितीचे सदस्य. म्हणूनच त्यांनी काही काळ काम केले. जानेवारी १९८५ या काळात त्यांनी रिझर्व्ह बँकेचे संचालक म्हणून काम केले. त्यानंतरची अडीच वर्षे नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष म्हणून त्यांनी जबाबदारी पाहिली.

अभ्यासू वृत्तीचे डॉ. मनमोहनसिंग यांचा अर्थशास्त्रातील व्यासंगच त्यांना राजकारणाच्या वाटेवर घेऊन आला. प्रशासनातील प्रदीर्घ आणि निष्कंलक सेवेनंतर २१ जून १९९१ या दिवशी केंद्रीय अर्थमंत्रीपदाची सूत्रे त्यांनी हाती घेतली. तेव्हा परकीय गंगाजळी घटली होती आणि परकीय कर्जाचा डोंगर वाढत होता. चलनवाढीचा दर नियंत्रणाबाहेर गेला होता. परंतु मनमोहनसिंग यांनी गुंतवणूक, भागीदारी,

उत्पादनवाढ आणि निर्यातवाढ या चतुःसूत्रीच्या सहाय्याने देशाची अर्थव्यवस्था त्यांनी गतिमान केली व तत्कालीन पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांच्या कारकीर्दीत सुरू झालेल्या या आर्थिक उदारीकरण आणि जागतिकीकरणाच्या पर्वाचे खरे शिलेदार ते बनले. त्यांनी २१ जून १९९१ ला या पदाची शपथ घेतली त्यावेळी वित्तीय तुट एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या साडेआठ टक्क्यांवर जाऊन पोचली होती. आयात-निर्यात व्यापारातील समतोल पूर्ण बिघडला होता. चालू खात्यातील तूट राष्ट्रीय उत्पन्नाच्या साडेतीन टक्क्यांवर गेली होती. अशा स्थितीत सलग सहा अर्थसंकल्प सादर करून त्यांनी अर्थव्यवस्थेचा गाडा पुन्हा मार्गावर आणला. खुल्या आर्थिक धोरणांबरोबरच कररचना सुलभ करण्याचे काम त्यांनी केले.

मनमोहनसिंग यांनी केलेल्या या पायाभूत कामगिरीमुळेच पुढील काळात अर्थव्यवस्थेला झळाळी लाभली. आंतरराष्ट्रीय बाजारात ऋणको म्हणून भारताची प्रतिमा उजळ आहे, असे अभिमानाने सांगून त्यांनी आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे कर्ज मंजूर करून घेतले. आणि मुदतीपूर्वीच त्याची परतफेडही केली. जगाच्या बाजारात भारताची पत उंचावण्याची महत्त्वाची कामगिरी त्यांनी केली. म्हणूनच १९९३ मध्ये सर्वोत्तम अर्थमंत्री म्हणून त्यांना 'युरोमनी अॅवॉर्ड' मिळाले. १९९३-९४ मध्ये आशिया खंडातील सर्वोत्तम अर्थमंत्री म्हणून त्यांना पुन्हा गौरविण्यात आले. तसेच त्यांना त्यांच्या सन्मानार्थ देशभरातील १२ विद्यापीठांनी सन्मानीय डॉक्टर प्रदान केल्या आहेत. भारत सरकारने ही १९८७ मध्ये त्यांना 'पद्मविभूषण' किताब देऊन त्यांना गौरवण्यात आले. १९७७ मध्ये त्यांना 'लोकमान्य टिळक पुरस्कारा'नेही सन्मानित करण्यात आले.

**'हमारी यह ख्वाईश है,**
**घर घर में चिराग जलते रहे ।'**

लोकसभेत १९९६ चा अर्थसंकल्प मांडताना केंद्रीय अर्थमंत्री डॉ. मनमोहनसिंग यांनी व्यक्त केलेली भावना आठ वर्षानंतर देशाचे पंतप्रधान म्हणून त्याची पूर्तता करण्याची संधी या सौजन्यशील, परंतु कठोर शिस्त अंगी बाणलेल्या नेत्याला लाभली आहे. म्हणून आपल्या देशातील सामाजिक वास्तवाचे भान असलेले, कार्यक्षम प्रशासक, जगातल्या सर्वात मोठ्या लोकशाहीचे पंतप्रधान आहेत ही आपल्या देशासाठी अभिमानाची गोष्ट आहे. त्याशिवाय कोट्यावधी भारतीयवासींच्या दृष्टीने ही अत्यंत आशादायी घटना आहे.

**- पंकजशिल दिनकर पाटील**
बी. ए. भाग २

***

# बाप

आई मांगल्य असते, तर बाप घराचं अस्तित्व असतो. पण या अस्तित्वाला कधी समजून घेतलेलं आहे काय ? वडिलांच्यावर जास्त काही लिहिलं जात नाही. 'व्याख्याता आईविषयी बोलत राहतो. संतानी, महात्म्यांनी आईचाच, तर देवादिकांनी लेखकांनी, कवींनी आईचे तोंडभरून कौतुक केलं आहे. कोणतीही चांगली गोष्ट असूदेत आईचीच उपमा दिली जाते, पण बापाविषयी कोठेच काही बोललं जात नाही. त्यांच्याविषयी दुसऱ्या भावनेनं बोललं व रेखाटलं जात, ते म्हणजे व्यसनी, तापट, मारझोड करणाराच. या समाजात असे बाप असतीलही पण चांगल्या वडिलांचे काय ?

सर्वांसमोर आई मोकळेपणाने रडू शकते पण रात्री उशीत तोंड खुपसून मुसमुसतो तो बाप असतो. आईकडे अश्रूंचे पाट असतात, पण बापाकडे संयमाचे घाट असतात. आई रडून मोकळी होते; पण सांत्वन वडिलांनाच करावं लागत आणि रडणाऱ्यापेक्षा सांत्वन करणाऱ्यावरच जास्त ताण पडतो. कारण ज्योतीपेक्षा समई जास्तच तापते ना ! पण श्रेय नेहमी ज्योतीलाच मिळत राहतं ! रोज जेवण करणारी आई आमच्या लक्षात राहते, पण आयुष्याच्या शिदोरीची सोय करणारा बाप कधी आठवणीत येत नाही असे का ? वडिलांना स्वतःचा बाप वारला तरीही रडता येत नाही. कारण छोट्या भावडांना जपायचं असतं, आई गेली तरीही रडता येत नाही, कारण बहिर्णीचा आधार व्हायचं असतं. जिजाबाईनी शिवाजी घडवला असं अवश्य म्हणावं; पण त्यावेळी शहाजीराजांची ओढाताण सुद्धा ध्यानात घ्यावी. देवकी, यशोदेचे कौतुक अवश्य कराव पण पुरातून पोराला डोक्यावर घेऊन जाणारा वसुदेव लक्षात ठेवावा.

मुलीला गाऊन घेतील, मुलाला लुंगी घेतील पण स्वतः मात्र पॅन्ट जुनीच वापरतील. त्यांची दाढी वाढलेला चेहरा काटकसर दाखवतो या काटकरीला कारणे भरपूर आहेत. महत्वाचं म्हणजे पोरीचं लग्न, पोराचं शिक्षण, घरात उत्पन्नाचं दुसरं साधन नसते, ऐपत नसते, तरीही मेडिकल, इंजिनिअरिंगला प्रवेश मिळवून दिला जातो. त्या मुलाला दर महिन्याला पैसे पाठवले जातात. पण सर्वच नसली तरी काही मूलं अशीही असतात की जी तारखेला पैसे येताच मित्रांना परमीटरुममध्ये पार्ट्या देतात, ज्या बापाने पैसे पाठवले त्याच बापाची टिंगल करतात. एकमेकांच्या बापांच्या नावांनी एकमेकाला हाका मारतात. वडिलांचं महत्व कोणाला कळतं ? लहानपणीच वडील गेल्यावर अनेक जबाबदाऱ्या खूप लवकर पेलाव्या लागतात. त्यांना एकेका वस्तुसाठी तरसावं लागतं.

चटका बसला, ठेच लागली, फटका बसला तर 'आई गं' हा शब्द बाहेर पडतो पण रस्ता पार करताना एखादा ट्रक जवळ घेऊन ब्रेक लावतो तेव्हा 'बाप रे' हाच शब्द बाहेर पडतो. छोट्या संकटांसाठी आई चालते, पण मोठमोठी वादळं पेलताना बापच आठवतो. काय पटतंय ना ? तरुण मुलगा उशिरा घरी येतो तेव्हा बापच जागा असतो. मुलाच्या नोकरीसाठी साहेबांपुढे लाचार होणारा बाप, मुलीच्या स्थळासाठी उंबरटे झिजविणारा बाप, घरच्यांसाठी स्वतःच्या व्यथा दडपणारा बाप, खरंच किती ग्रेट असतो ना !

– खोत अमोल मा.
बी. ए. भाग - १

# तोच सुदिन असेल !

आजचे आदर्श काय ? भ्रष्टाचारी राज्यकर्ते, लाचखाऊ अधिकारी, दहशतवादी पुढारी, स्वार्थी सत्तांध सत्ताधीश, घोटाळ्यातले नेते. या आदर्शाकडे बघूनच नवी वाटचाल होते आहे. जुन्या पिढीकडे जे आदर्श होते तसे आदर्श कुठे दिसतात का ?

मनुष्य हा समाजप्रिय प्राणी आहे. आणि तो समाजात राहूनच आपले जीवन व्यथित करत असतो. जीवनात यशस्वी होण्याकरिता त्याची सतत धडपड चालू असते. या धडपडीतूनच त्याच्या जीवनाची घडण होत असते. यशस्वी जीवनाच्या वाटचालीत अनेक अडचणी आणि संकटे येत असतात. या साऱ्यावर मात करून यशाचे अत्युच्य शिखर गाठण्याचा प्रयत्न करत असतो. अशावेळी दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करणारे आदर्श नसतील तरच नवल ! आदर्शप्रत जाणारे जीवन असेल तरच तो यशस्वी होईल.

आज आम्हा विद्यार्थ्यांपुढेच नव्हे तर साऱ्या समाजघटकांपुढेच हा प्रश्न उभा आहे की आपण कोणता आदर्श आपणासमोर ठेवावा ? आदर्श जीवन जगण्यास कोणता मार्ग अवलंबावा ? आदर्शांच्या कल्पना काय ? आदर्श म्हणजे तरी काय ? असे यक्ष प्रश्न उभे आहेत. आज बोलले जाते की विद्यार्थ्यांपुढे आदर्शच नाहीत. विद्यार्थी बिघडला आहे, बेशिस्त बनला आहे. पण हे म्हणणे बरोबर नाही. कारण आज ज्या परिस्थितीतून त्याला जावे लागते आहे त्या गोष्टी त्याला कारणीभूत आहेत. आदर्श जे असतील त्यानुसार तो घडत असतो. मग एकांगी विचार करून कसे चालेल ? म्हणून मी म्हणतो विद्यार्थ्यांसमोर अगर कोणत्याही व्यक्तीसमोर जे आदर्श असतील त्यानुसारच त्याचे वर्तन घडत असते. त्यानुसारच त्याचे चांगले अथवा वाईट वर्तन असा विचार करावा लागेल.

एकेकाळी सुवर्णभूमी म्हणून गणला गेलेला आपला भारत देश ! आज त्याची काय अवस्था झाली आहे ? सुधारणा सुधारणा म्हणून आल्या आणि मानव्य हरपून बसलेले जीवन जगावे लागत आहे म्हणून या साऱ्या गोष्टींवर मात करायची असेल तर आदर्श मूल्यांची जोपासना झालीच पाहिजे.

महाभारत काळात श्रीकृष्णासारखा मुत्सद्दी राज्यकर्ता होऊन गेला. प्रजाहितदक्ष बनला. रामासारखा प्रजेच्या मताप्रमाणे राज्यकारभाराची सूत्रे होती घेऊन आयुष्यभर कष्ट सहन करणारा राज्यकर्ता हे आदर्शच नव्हे काय ? जिजाबाई शिवाजी राजांना रामायण सांगून स्वराज्याची निर्मिती घडवत हा आदर्शच म्हणावा लागेल.

विद्यार्थी हुंड असतात, खट्याळ असतात, हट्टी असतात, लाडावलेले असतात. मुले अवखळ असतात. विविध थरातून आलेली असतात. हे सारे क्षम्य मानून त्यांना वळण लावण्याचे कार्य पालक, शिक्षक व पुढारी यांनी केले पाहिजे. यासाठी त्यांच्यापुढे चांगले आदर्श असतील तर चांगले बनतील, वाईट आदर्श असतील तर वाईट बनतील. समाज म्हटला की, त्यात चांगले वाईट, सुष्ट-

दृष्ट, नवे-जुने सारे आलेच. यात कालचे आणि आजचे आदर्श यांचा आपण विचार करू लागलो तर अप्रगत समाजजीवनाचा आणि प्रगत समाजजीवनाचा साकल्याने विचार करावा लागेल.

स्वातंत्र्यपूर्व काळात समाजबांधवांच्यासमोर जो इतिहास आला, अवती-भोवती ज्या घटना घडत राहिल्या त्यांचा परिणाम त्यांच्या जीवनावर झाला. वैभवाचा, सुखसंपन्नतेचा काळ आणण्यासाठी ध्येयपथावर आरूढ होऊन यशाच्या दिशेने वाटचाल करणारी क्रांतिकारक पिढी निर्माण झाली. त्यांच्यासमोर जे आदर्श होते त्यातून ते घडले. 'श्यामची आई'सारखा आदर्श होता. गांधी, टिळक, आगरकर, अशा नेत्यांचे, तसेच गडकरी, खाडीलकर, केशवसूत, तांब्यासारखे आदर्श जुन्या पिढीसमोर होते. विद्‌वान पंडितांच्या सहवासातून त्यांची मने घडत होती. धाडसी वृत्तीचे दर्शन घडवून जाणणारी पुरुषार्थ दाखविणारी पिढी निर्माण होत होती. स्वातंत्र्याच्या होमकुंडात निस्वार्थपणे स्वतःला झोकून देणारी पिढी निर्माण झाली हे त्यांच्यासमोर असलेल्या आदर्शामुळेच होय.

नवीन प्रदेश शोधून काढणारे कोलंबससारखे प्रवाशी, रोगावर मात करणाऱ्या औषधांचे संशोधक, एव्हरेस्ट सर करणारा हिलरी, तेनसिंग, चंद्रावर पाय ठेवणारे नील आर्मस्ट्राँग, ऑल्ड्रीन हे अवकाश वीर, विमानाचा वापर करून धुव्वा उडविणारे शूर सैनिक हे तत्कालीन आदर्शच होय. 'यत्न हाच परमेश्वर' त्यांनी मानला तोच आदर्श ठेवला.

आपला देश नवरत्नांची खाण आहे. ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास यांच्यापासून गांधी, नेहरू पर्यंतच्या या नररत्नांची नव्या पिढीपुढे नवे आदर्श निर्माण करून ठेवले आहेत. आपल्या ध्येयपथावरून तसूभरही न हटणारी ही नररत्ने कालच्या पिढीपुढचे आदर्शच होते. शब्दरूपी धन वाटत फिरणारी तुकोबा त्यांचे अभंग आजसुद्धा सामान्यांच्या गळी उतरले आहेत. ज्ञानेश्वरांची विराणी व पसायदान आजही ऐकू येत आहे. अशावेळी स्वतःच्या क्षुल्लक स्वार्थासाठी देशाचे स्वातंत्र्य धोक्यात आणणाऱ्यांना हे कालचे आदर्श नक्कीच उपयोगी ठरणारे आहेत.

आज आदर्श नाहीत असे मी म्हणत नाही पण मी म्हणतो आजचे आदर्श हे आदर्शाप्रत नेणारे नसून विनाशाकडे जाणारे, अधोगतीकडे नेणारे आहेत. नव्या भावी पिढीपुढे काय आदर्श आहे ?

'यत्न तो देव जाणावा' या ध्येयाने प्रेरित झालेली जुनी पिढी निर्माण झाली. यत्न देवांची अखंड आराधना करून जनकादिक कृतार्थ झाले. यत्न हा अनादी अनंत आहे त्याची आराधना केली तरच कल्याण होते जीवन जगताना हे आवश्यक आहे. कचाने 'संजीवनी' विद्या मिळविली. प्रभू रामचंद्राने वनवासात धैर्याने साऱ्या गोष्टींना तोंड दिले. चक्रव्युहाचा भेद करणारा अभिमन्यू ! छत्रपती शिवाजी राजे ! हे सारे आदर्श समोर ठेवून कार्यरत राहिली, ती जुनी पिढी.

पण आज या नव्या पिढीपुढे कोणते आदर्श राहिले आहेत ? ऐतखाऊ स्वार्थी माणसे दिसतात. आयत्या पिठावर रेघोट्या ओढणारी ही माणसे आहेत. आजच्या आदर्शांकडे वळलो तर कोणते आदर्श आहेत ? चित्रपटाच्या स्वप्नसृष्टीत रममाण झालेली, भ्रष्टाचारी, स्वार्थी, दरोडेखोरी, चोरी, दहशतवादी वृत्तीच दिसते. हेच सारे आदर्श !

आजच्या नव्या पिढीपुढे असलेले नवे आदर्श कालमानपरत्वे बदलले आहेत. बदलणे साहजिकच आहे पण ते त्याला कुठपर्यंत घेऊन जाणारे आहेत. कुठल्या खाईत लोटणार आहेत कोण जाणे ?

चित्रपटातल्या हिरो हिरॉईनचा पोशाख कोणता ? त्यांची स्टाईल कशी ? या साऱ्याचे अनुकरण नवी पिढी करते. त्यामुळे समाजजीवन विकृत बनले आहे.

आज आदर्श दिसतात पण ते सारे दर्यात खसखस असल्याप्रमाणे दिसतात. आमटे, शेषन, हजारेसारखी निःस्वार्थीपणे कार्याला वाहून घेणारी आदर्श हिरवळ मनाला ओलावा देते. पण या हिरवळीचा समाजमनावर कितपत प्रभाव पडतो आहे हा प्रश्न महत्वाचा आहे. समाजाचा कणा असलेल्या बुद्धिजीवी मध्यमवर्गाची वृत्ती दुहेरी बनली आहे. एका बाजूला त्यांना धनिकांबाबत असूया आहे, ते जीवन मोह घालते. जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न करत आहेत. तर दुसऱ्या बाजूला बहुसंख्य दीनदलितांबद्दल मध्यमवर्गीयांच्या मनात कमालीची तुच्छता आहे. त्यांच्या दुःखाची पर्वा नाही, सहानुभूती नाही. त्यामुळे या भयंकर परिस्थितीचा परिणाम समाजातील सर्व थरावर झाला आहे.

या साऱ्या गोष्टींचा विचार करता मला असे म्हणावेसे वाटते की, बालमनावर सुयोग्य संस्कार करणारे प्रेमळ, निस्वार्थी, उदात्तवृत्तीचा प्रत्यय येणारे आदर्श समोर ठेवून सभोवतालच्या दूषित वातावरणातही आपली मने पुष्कळ संयमी व स्वच्छ राहू शकतील आणि मोहाच्या क्षणावर मात करू शकतील असे घडेल तोच सुदिन असेल - आपला, आणि आपल्या देशाचाही !

सुशांत कपले

बी. एस्सी भाग ३

***

# संस्कार

संस्काराचा झरा चारित्र्याच्या डोंगरावरून झिरपत असतो. सुसंस्कार जोपासणारे कुटुंब भाग्यवंत ठरते. कुसंस्काराची दुर्गंधी प्रत्येक नवोदित तरुणाचे आयुष्य नासवीत असते. संस्कार सहजपणे कुणाला देता येत नाहीत; मात्र ते घेता येणे सहजशक्य असते. जखमेचा व्रण जसा मिटत नाही; तसेच संस्कार वृत्तीतून लवकर नष्टही होत नाहीत, इतके ते दृढ असतात. वृत्ती-प्रवृत्ती ही संस्काराची खाण असते आणि अनुकरण हे त्या खाणीतील खनिज असते. अंधश्रद्धाळू संस्कार टाळता आले, तर भावी पिढी उत्कर्षाप्रत जाऊ शकते.

संस्कार म्हणजे विचार नव्हे, तर ती एक आचार अनुभती असते. म्हणूनच संस्कार कुणावरही लादता येत नाहीत. विवेकात संस्काराचा गर्भ रूजतो, विचारातून तो वाढत जातो आणि आचरणातून संस्कार जन्म घेतो. सुसंस्कार ही भावी पिढीसाठी राखून ठेवलेली ठेव असते. मानवी व्यवहारात सुसंस्काराचा अंतर्भाव असतो. हे व्यक्तिमत्व अत्यंत आकर्षक असते.

संस्कार सुखी जीवनाचा मंत्र आहे, त्याने मनुष्य नासतो तरी किंवा घडतो तरी.

– सचिन जाधव

बी. एस्सी. भाग १

# ऋणानुबंध

माणसाचं मन हे आशावादी असतं. चांदण्यानं भरूनसुद्धा आपलं आभाळ रिकामच असतं. एखादी गोष्ट मिळाली की, त्यांच्या पुढच्या गोष्टीचा आपण विचार करू लागतो हा आपला स्वभावच असतो.

जीवनात अनेक व्यक्ती भेटतात, त्या सर्वांबद्दलच आपल्याला काही विशेष ओढ वाढते असं नाही, पण एखाद्या व्यक्तिच्या केवळ पहिल्याच दर्शनात जिव्हाळा, आकर्षण निर्माण होतं. कोणतीही नवी नाती जोडताना सुरुवातीला मी खूप टाळाटाळ करते, कारण एकदा नाती जुळली की, दुरावताना व जपताना खूप त्रास होतो. माझं असं मत आहे की, ठराविक नाती पूर्ण आत्मरूपाने जपायची व ती शेवटपर्यंत टिकवायची. मी माझ्या या मतावर अजूनसुद्धा ठाम आहे. ही ठराविक नाती टिकवताना कधी-कधी कितीही आसवे पुसली तरी पापण्याकडे. फिरून येतात आणि यातील सुखाचीही तुलना करता येत नाही.

माझ्या आयुष्यात असंच काही व्यक्तींना मी पहिल्यापासून खूप मानलं होतं, आहे आणि राहीन. त्यांच्याविषयी मी सुरुवातीपासून आणि आतासुद्धा खूप हळवी आहे. त्या व्यक्ती म्हणजे, 'माझा दादा आणि चाचा' हळूहळू या वाटेवरती मला काही आणखी व्यक्ती भेटल्या. त्यामध्ये माझे गुरुवर्य आणि बरेच मित्र, मैत्रिणी आहेत, पण गुरुविषयी काही सांगायचे तर शब्दांत मांडताच येत नाही. शब्द हलके पडतात. पण अलीकडे जसजशी वेळ चालली आहे, तसतशी मला भीती वाटते की, ही नाती भविष्यकाळात तुटणार तर नाहीत ना ? ही नाती तुटण्याइतकी हलकी नाहीत हे मला माहीत आहे, पण कितीही वाटलं आणि आवडली तरी प्रत्येक गोष्ट माणसाच्या मनासारखी होईलच, असे नाही. याबाबतीत मला त्यांच्याकडूनही प्रतिसाद मिळतो. माझ्या मनामधलं हे गुज मात्रमाझ्या मैत्रिणीला कळलं. सुख-दुःखाच्या या वाटेवरती मला तिच्या मैत्रिची साथ नेहमी मिळते. एक बहीणच म्हटलं तरी चालेल.

माझ्या आयुष्यात जीवनाच्या प्रत्येक वळणावर, मला आठवणं यांची येत राहील, अलगद अशा पापणीवरून अश्रू एखादा ओघळून जाईल. काही गोष्टीच अशा असतात की, त्या विसरू म्हटलं तरी नाही विसरता येत. प्रेमाची नाती ही कुणाच्या सांगण्याने जुळत नाहीत. त्याला भावनेचा ओलावा लागतो. नात्यांचे बंधन कधीही प्रेमात नसते. आपण एकत्र येतो ते विचारांची देवाण-घेवाण करण्यासाठी, नाती जोडण्यासाठी. आपण येतो पण पुरेसा सहभाग घेत नाही. यावेळी आपण स्वतःला आणि दुसऱ्याला फसवत तर नाही ना ?

मी देवाची सदैव ऋणी राहीन की, ज्यांच्यामुळे मला अशा व्यक्तींचा सहवास लाभला व हे ऋणानुबंध निर्माण झाले.

– कु. अनिता रघुनाथ पोवार
बी. ए. भाग १

# महाविद्यालयाचा रक्षणकर्ता...

चढत्या वैशाखात गार वाऱ्याच्या झुळका येऊ लागल्या आणि मी सुखावलो. पावसाच्या दमदार सरींनी मातकट गंधात मन हरविले. महाविद्यालयाच्या पटांगणाच्या भेगा बुजू लागल्या. तहानलेलं मैदान कोरडा घसा ओला करून घेऊ लागलं. हळूहळू पाण्याचे ओहोळ सुरू झाले. पाट वाहू लागले.

महाविद्यालयाचाही तो प्रारंभ होता, विद्यार्थ्यांच्या सोबत प्राध्यापकांची उपस्थिती थोडी बिकटच होती. नेत्रासमोर दिसत होता ८०-९० मीटर उंच विद्यालयाचा पाठराख्या रक्षणकर्ता डोंगर. महाविद्यालयाच्या आजूबाजूला तो खूपच पसरला होता. महिनाभरानं तो आपलं रूप आणखी बदलणार होता. गवत उंच वाढणार होतं. अनामिक झाडंझुडपं आपला क्षणिक संसार उभा करणार होती. नागमोडी वळणं घेतलेला तो कालवा पूर्ण क्षमतेनं भरून वाहणार होता. गुराख्यांच्या गाई-म्हैशी चरायला सुटणार होत्या. निसर्गाच्या त्या रंगमंचीय नाट्याचा मूक साक्षीदार होण्यासाठी मन आतुर झालं होतं.

माझी भटकंती सुरू करण्यासाठी मी निघालो. हातातील वह्या कॅन्टीनला ठेवल्या. पावसाच्या तोंडालाही पेवं फुटलं होतं. पडसालच्या अग्निपंख रोहितांच्या दीर्घ सहवासाने सुखावलो होतो. त्या आठवणी मनात अजूनही ताज्या होत्या. रानपाखरांचा कलकलाट अदृश्य झाला. मळलेल्या पाय वाटेनं मी चालत होतो. महाविद्यालयही अदृश्य होत होती. मध्यावधीतच आसरा मिळाला. अनामिक वृक्षांचा. वेळेचं भान नव्हतं. लक्ष होतं निसर्गाच्या भल्या मोठ्या देणगीकडं. झाडाचं ओलचिंब भिजलेली बुंधं आकर्षित करीत होतं. मुळांची बैठक नुसती तासलेली नव्हती. पॉलिश पेपरनं घासून गुळगुळीत केल्यासारखी वाटत होती. भले मोठे काळेभोर दगड त्या डोंगरावर बेवारसपणे विखुरले होते. मायेविना माणसाची अवस्था होते तीच त्या दगडधोंड्याची झाली होती.

कित्येक ऊन-पावसांचा आस्वाद घेतला असेल त्या बिचारांनी, कुणास ठाऊक !

अचानक पाऊस थांबला अन् पुढचा प्रवास सुरू झाला. त्या रक्षणकर्त्याच्या माथ्याला लहान मोठे किडेही इकडे तिकडे उडत होते. अल्पावधीतच माथ्यावर पोहचलो.

या डोंगरासोबत चारही बाजूला असणाऱ्या डोंगरांनी हिरवी शाल परिधान केली होती. एका कोपऱ्यात थोडसं जुनाट मंदिर. चारही कोन एकत्र जोडून मंदिराला कळसाचा आकार दिलेला. त्यातूनच दहा-बारा फूट उंच मेसाची काठी भगव्या ध्वजासह वाऱ्याच्या दिशेने झुकली होती. ध्वज भिजला होता. गाभाऱ्यात सुंदर, सुबक एका हातात गदा पायात वाळा घालून, रंगीत, मारुतीची मूर्ती जणू माझ्या अंगावर झेपावतीय अशी वाटत होती.

पूर्वेकडील सखल भाग एखाद्या खोल दरीसारखा वाटत होता. डोंगराच्या पुढील बाजूस दुसऱ्या कोपऱ्यातून वाहत आलेला झरा अप्रतिम आल्हाद देणारा पाण्याचा पातळ पडदा संथ गतीने पूर्वेकडील सखल भागात कोसळत होता. चार-सहा पाखरे त्या पाण्याने आपल्या तहानेला विसावा देत होती. एका ससाण्याने पाण्यात सूर मारली अन् कलकलाट करत ती पाखरेही निघून गेली. झुडपावरून अचानक एक वेगळेच फुलपाखरू समोर आले. तांबूस रंग काळे ठिपके, पोटाकडेच्या बाजूला पिवळा-पांढरा रंग पसरलेला मला वाटतं 'बहुधा क्रॉसबीड असणार.'

एका झाडावर सुगरण खोपा बांधत होता. पायाखालच्या गवतातून तुडतुडे, घोडे उडत होते. पश्चिमेला सांध्यरंगानी ढग आच्छादले होते. हाच तो महाविद्यालयाचा रक्षणकर्ता मिलनाची वेगळीच ओढ दाखवत होता. निसर्गरम्य परिसरात मी हरवलो होतो. अन् नकळत मनात शब्द घोळले,

**'माझ्या संवेदना बधीर करून**
**समाधानी श्वास चालू ठेवणाऱ्या**
**अन् महाविद्यालयाच्या अभिमानानं**
**माझ्या पोकळ छातीचा फुगा फुगवणाऱ्या**
**या रक्षणकर्त्याचा अनंत ऋणी आहे,'**

सोसाट्याच्या वाऱ्याने ओलचिंब झालेले कपडे अंगाला चिकटले होते. अंगाला गारवा जाणवत होता. पायही थकले होते. आगं मागं न पाहता डोंगराची उतार उतरू लागलो सूर्यास्त होणार होता. गावी परतायचं होतं एकाच गोष्टीनं मी पस्तावलो होतो.

'ऐतिहासिक डोंगरभूमी ही महामानवाच्या महास्वप्नाप्रमाणेच भव्यदिव्य असणार आहे.' हे

इथं खऱ्या अर्थानं जाणवत होतं.

**– व्ही. बी. शिंदे**
बी. एस्सी. भाग ३

# श्रद्धाची अधुरी कहाणी...

आज 'श्रद्धा इन्स्टिट्यूट'चे उद्‌घाटन. कॉलेजमधील सर्व मित्रमंडळी जमा झाली होती. कॉलेजच्या पूर्व आठवणीना उजाळा मिळत होता. प्रत्येकजण कोणत्या ना कोणत्या क्षेत्रात आपली किमया दाखवत होता. पण या सर्वांच्यापेक्षा वेगळं क्षेत्र निवडणारा होता तो म्हणजे 'रोहित'. आज तो यशाच्या अत्युच्य शिखरावर आहे. या त्याच्या यशामागे अनेक गोष्टी कारणीभूत होत्या. त्या यशाचा फार मोठा मोलाचा वाटा व या यशाची प्रेरणा 'श्रद्धा' होती.

श्रद्धा ही सरळ स्वभावाची, हुशार, फुलाप्रमाणे नाजूक, सर्वांचे मन आकर्षून घेणारी. वर्गामध्ये कधीही आपला नंबर न सोडणारी, ग्रंथालयात तासन्‌तास अभ्यास करणारी, पुस्तक प्रेमी श्रद्धाच्याच वर्गामध्ये शिकणारा रोहित हा सुद्धा हुशार, अभ्यासू आणि शांत स्वभावाचा, जेव्हा श्रद्धाने कॉलेजमध्ये नवीन प्रवेश घेतला तेव्हा कॉलेजमधील मुली-मुले श्रद्धाची चेष्टा-मस्करी करायचेत. उगाचच एखाद्या साध्या गोष्टीवरुन मुली तिच्याशी वाद घालायच्या हे रोहितला आवडत नसायचं. अशा वेळी तो श्रद्धाच्या बाजूने बोलायचा. गुंडप्रवृत्तीची-दंगामस्ती करणारी वर्गातील मुलंही श्रद्धाला वर्गात-वर्गाबाहेर काहीतरी बोलत पण श्रद्धा हे निमूटपणे सहन करायची. हे सर्व रोहित पाहत होता व तिला आधार देत होता. ती कॉलेज सोडण्याच्या तयारीत होता. पण रोहितने तिला आधार दिला तेव्हापासून मुले-मुली तिच्या वाटेला जायची बंद झाली. कॉलेजच्या पूर्वपरीक्षेमध्ये जेव्हा श्रद्धा पहिली आली तेव्हा तर सर्वांचे आवाजच बंद झाले.

रोहित व श्रद्धा वर्गात दोघेही हुशार या हुशारीतुनच दोघांची भेट रोज ग्रंथालयात व्हायची. तो तिला तिच्या अभ्यासामध्ये मदत करायचा. तीही त्याला मदत करायची. असे अनेक दिवस गेले. दोघेही शब्दांतून कोणीच व्यक्त करत नव्हते. श्रद्धा ग्रंथालयात अभ्यास करत होती तेथे अचानक रोहित आला. त्यांच्या हातात एक कादंबरी होती. तो तिला देत म्हणाला, ''ही कादंबरी वाच. तुला नक्कीच आवडेल.'' तिने ती कादंबरी वाचली. कादंबरी खूपच चांगली होती. त्या कादंबरीमध्ये असणारा नायक हा तिला जणू रोहितच वाटायचा. तिला तो आता आपलासा वाटू लागला. त्या कादंबरीमध्ये प्रियकराने लिहिलेले प्रेमपत्र -

तू क्षितिजाच्या झुल्यावर झुलतेस
टपोऱ्या डोळ्यांनी आमंत्रण देतेस
तुझ्याकडे येणारी वाट
गुलमोहराची फुले माळून सजलेली असते.

हे काव्य वाचल्यावर तिला रोहित आपलाच वाटू लागला. जेव्हा आपल्या मनातील विचार तिने त्याला स्पष्ट सांगितले तेव्हा रोहित थोडा गोंधळला आणि त्यानेही तिला लग्नासाठी होकार दिला.

दोघांनीही आपआपल्या घरच्यांची संमती घेतली व लग्न करावयाचे ठरले. पण दोघांच्याही शिक्षणामध्ये अडथळा नको म्हणून नंतर लग्न करावयाचे ठरले. दोघांचाही अभ्यास जोरात चालू होता. पण दिवसेंदिवस श्रद्धा मात्र अशक्त होत चालली. तिचे आजारपण वाढू लागले असे काही महिने गेले. आजाराचे डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार निदान केले. निदानाचा रिपोर्ट हातात आल्यानंतर मात्र रोहितचे प्राण कंठाशी आले. डॉक्टरांची शंका नक्कीच खोटी असेल असे त्याला वाटले. देवाने Not to be असा निर्णय दिला. श्रद्धाला कॅन्सर झाला होता. ब्लड कॅन्सर होता तो कधीही न बरा होणारा. त्यामुळे रोहित खचून गेला. त्याच्या जीवनात हे फार मोठे वादळ आले. त्याची नाव या वादळात सापडली होती. ती कधीही बाहेर येणार नव्हती.

ही गोष्ट जेव्हा श्रद्धाला कळली तेव्हा ती रोहितच्या कुशीत डोके ठेवून खूप रडली. ती रोहितला म्हणते, 'रोहित मला खूप जगायचं आहे. फक्त तुझ्यासाठी जगायचं आहे पण...'

आणि एकेदिवशी तिने रोहितच्या मांडीवर आपले प्राण सोडले. कायमची चिरनिद्रा घेतली. रोहितनं स्वतःला सावरलं व श्रद्धाच्या नावासाठी 'श्रद्धाच्या प्रेमापोटी अशा श्रद्धा निघून जाऊ नयेत म्हणून आपले सर्वस्व कॅन्सर इन्स्टिट्यूटला अर्पण केलं. आपली सर्व संपत्ती कॅन्सरच्या संशोधनासाठी व औषधासाठी ओतली. कारण श्रद्धासारख्या अनेक श्रद्धा तेथे वाचू शकतील. हे शहरातील खूप मोठे इन्स्टिट्यूट आहे. त्याचेच हे उद्घाटन होत आहे.

– **अर्चना पोवार**
बी. ए. भाग दोन

# अपयश आले तर हेटाळणी केली जाऊ नये...

## उद्योजकता विकास प्रशिक्षण शिबीरात सहभागी असताना आलेला अनुभव.

आजची युवापिढी खरोखरच भरकटते आहे का ? युवापिढीचे मानसिक संतुलन ढासळत आहे का ? शिक्षणामुळे आजच्या युवापिढीचे व्यक्तिमत्व फुलवले गेले आहे. तिच्या शारीरिक, मानसिक व बौद्धिक विकासही झाला आहे. पण तरीही पोटापाण्याचा ज्वलंत प्रश्न मात्र सुटलेला नाही, हातात पदवी आहे मात्र ती नाममात्र ! कुठेही वशिल्याशिवाय तिचा उपयोग होत नाही. कुठल्याही जागेसाठी स्पर्धेची तीव्रता भयानक आहे. त्यामुळे आजचा युवा वर्ग भांबावलेला आहे. उत्तम गुणवत्ता, जिद्द, कार्यप्रवणता अंगी अजूनही त्यांच्या पदरी निराशाच येते.

उद्योजकता विकास शिबीराच्या निमित्ताने अनेक आय. टी. आय. पदवीधर, उच्च पदवीधर युवकांशी माझा परिचय झाला. वरवर पाहता आजची पिढी ही आळशी, निष्क्रीय, इन्स्टंट कामाची अपेक्षा करणारी असे आरोप आपण नेहमी ऐकतो. पण माझा प्रत्यक्षातील अनुभव मात्र निराळा होता. या प्रशिक्षणकाळातील त्यांचे चातुर्य वेळोवेळी येणाऱ्या मार्गदर्शकाकडे जिज्ञासूपणे त्यांनी विचारलेल्या शंका, आयुष्यात काहीतरी भरीव करून दाखविण्याची जिद्द, त्यासाठी लागणारी मेहनत चिकाटी या कुठल्याच गोष्टींची या पिढीजवळ कमतरता नव्हती. अतिशय उत्कठतेने भावी जीवनाविषयीची उद्दिष्ट्ये ठरवणारी ही पिढी काही काळातच मरगळत जाणार आहे. असे सांगूनही कोणाला पटणार नाही 'सर' हा माझा प्रोजेक्ट रिपोर्ट आहे. बघा, संपूर्ण तयार झाला आहे. अगदी कोटेशनमधील कुठली कमतरता तर राहिली नाही ना ? अशी विचारणा या शिबीरातील माझे उत्साही सहकारी मित्र जेव्हा संबंधीत अधिकाऱ्याकडे करीत तेव्हा मलाही वाटायचे की खरोखरीच भावी पिढी आयुष्यात काहीतरी घडणार आहे. घडवणार आहे. पण प्रत्येक ठिकाणी त्यांची कार्यकुशलता थोपविण्याचे कामपण हाच करीत होता. उमेदीने वाटचाल करणाऱ्या या युवकांना कागदपत्राची अपूर्णता आहे. यावर सहीच हवीय. साहेब आठ दिवस बाहेर गावी गेलेत, असे सांगून वाटेला लावले जात होते. तरीही नेटाने मार्ग काढून पुढे जाण्याची इच्छा बाळगणारी हे तरुण ज्यावेळी तुमच्या प्रोजेक्ट रिपोर्टमध्ये काही त्रुटी आहेत किंवा तुमचे पूण प्रपोजल मंजूर करणे सध्या तरी शक्य नाही हे उत्तर ऐकायला मिळेल त्यावेळी मात्र मानसिकदृष्ट्या पूर्ण होत. सरकारी सुविधा तुमच्यासाठीच आहेत त्याचा योग्य फायदा घ्या, असे प्रशिक्षण काळात सतत कानावर घडत होते. पण आज वेळेवर मात्र योग्य फायदा करसा घ्यायचा हेच सूचत नव्हते. द्विधा मनःस्थितीने उद्विग्न झालेली मुले घरातही सहानुभूतीला पात्र ठरण्याऐवजी अपेक्षेला पात्र ठरत. तुमच्याकडून काहीच होणार नाही. तुझ्याच बरोबरीचा तो... बघ ! या वाक्यांनी जर या मुलांचे मानसिक संतुलन ढासळले तर हा दोष कुणाचा ? सामाजिक परिस्थितीचा ? पालकांचा ? की सरकारचा ?

कमीअधिक प्रमाणात मुलांकडून चुका होतात, पण त्या त्यांना दाखवणे हे तितकेच

महत्वाचे नाही का ? प्रशिक्षण एक देतो, विविध परवानग्या मिळविण्यासाठी वेगवेगळ्या कार्यालयांशी संपर्क साधावा लागतो. भांडवलासाठी वेगळाच प्रयत्न लागतो. कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी वणवण करीत चकरा माराव्या लागतात. काम करण्याची दमछाक होते. यासाठी काही ठोस योजना हवी. एखाद्या मुलाकडून लगेच कार्याची अपेक्षा ठेवणे कितपत योग्य ? तसेच त्याच्या कार्यपद्धतीवर टीका करणे हेसुद्धा चुकीचे आहे. उलट अशावेळी त्याला मानसिक बळ दिले पाहिजे. आर्थिक बळापेक्षा हे मानसिक बळच त्याला जीवनात उभे करू शकते. अन्यथा भोवतालच्या या साध्या परिस्थितीमुळे मुले वैफल्यग्रस्त होतात व अशा नैराश्यातून ती वाममार्गाकडे बळण्याचा संभव असतो.

यासाठी समाजाने, पालकांनी, मार्गदर्शकांनी युवा पिढीला योग्य ते सहकार्य (केवळ नाममात्र नव्हे) करावे काम न झाल्यास त्याची हेटाळणी न करता त्यांच्या आत्मविश्वास जागृत करावा. शिक्षणाबरोबरच व्यवसायाभिमुख शिक्षण पद्धतीवर भर द्यावा. बेकारीचे प्रमाण वाढल्यानेच समाजात अनिष्ट, विघातक परिस्थिती निर्माण झालीय. ही परिस्थिती बदलायची असेल तर केवळ युवा पिढीला दोषी न धरता या पिढीची मानसिकता समजावून घेतली पाहिजे आणि त्यानुसार बदलही घडवून आणले पाहिजेत. आजची युवा पिढी ही संयमी, जिद्दी आणि मेहनती अति कष्टातून आपले इप्सित साध्य करणारी आहे. फक्त त्यासाठी त्यांना प्रेमाची वात्सल्याची आणि योग्य मार्गदर्शनाची जोड हवी आहे.

**– राजाराम बी. कांबळे**

बी. ए. भाग तीन

# प्रगतीचे चिन्ह आहे परिवर्तन

स्थिरता जडतेचे चिन्ह आहे आणि परिवर्तन प्रगतीचे. स्थिरतेमध्ये निरसता आणि निष्क्रियता असते परंतु परिवर्तन नवीन चिंतनाचा आणि नविन अनुभवाचा मार्ग प्रशस्त करते. जीवन प्रगतशील आहे. यामध्ये परिवर्तन आवश्यक आहे. त्याबरोबर ते अनिवार्यही आहे. प्रगतशील मनुष्य परिवर्तनाला घाबरत नाही तर तो त्याचे समर्थन करतो आणि स्वागतही करतो. आकाशामध्ये सर्व गृह गोल गतिशील असतात त्यामुळे त्यांचे चुंबकत्व स्थिर राहते. आणि त्याआधारे त्यांचे परस्पर आदान-प्रदान होत राहते. जर ते निष्क्रीय राहिले असते तर आपली ऊर्जा ते गमावून बसले असते. जो पुढे जाऊ शकत नाही तो स्थिरही राहू शकत नाही. स्थिरतेवर संकट येताच त्याचा परिणाम विनाशामध्येच होतो. अस्तु जीवनाला गतिशील रहावे लागते. जे निर्जीव आहेत ते गतिहीन नाहीत.

युगे बदलत राहतात, परिवर्तनाच्या क्रमांमध्ये आशा आणि निराशेच्या संधी येत राहतात. रात्र आणि दिवस, स्वप्न आणि जागृती, जीवन आणि मरण, शीत आणि ग्रीष्म, हानी आणि लाभ, संयोग आणि वियोग हे अनुभव वाटतात तर एकमेकांच्या विरोधी परंतु शेवटी ते एक दुसऱ्यांशी गुंतलेले असतात आणि दुहेरी रसस्वादनाचा अनुभव देत राहतात. ऋण आणि धन या दोन्ही प्रवाहांच्या मिलनानेच विद्युतच्या सामर्थ्याच्या प्रभावाचा जन्म होतो. संकटे मनुष्याला सशक्त, जागरूक आणि साहसी बनवतात. असुविधा उत्साह वाढवितात आणि प्रगतीसाठी सुविधा प्रदान करतात. एकाकी राहिल्यामुळे दोन्हीही अपूर्ण आहेत. पूर्णतः प्राप्त होण्यासाठी पुढे जाण्याचा दुर्दम्य उत्साह आणि अडथळ्यांशी झुजण्याच्या पराक्रमांची आवश्यकता असते.

**– पोतदार प्रकाश भाऊसो**

बी. ए. भाग १

# मैत्री

सात सुरांनी बनला एक शब्द
त्या शब्दांत आहे जीवनातील सारा अर्थ
असा कोणता बरा तो शब्द ?

प्रितीच्या मायेत, अमृताच्या छायेत, उज्वल झाला.

असा शब्द आहे मैत्री. मैत्री अन् मैत्री....

जगात काही गोष्टी अशा आहेत की,

ज्यांचे मोल कधी करता येत नाही. त्यापैकी एक म्हणजे मैत्री. मैत्री हा अनमोल ठेवा आहे. तो खऱ्या अर्थाने धनवान असतो. नाहीतर कोट्यवधी रुपये आहेत पण मनीचे सुख दुःख उघड करायला कोणीही मित्र नाही. तो राव असूनही रंकच ठरतो.

मैत्री ही ठरवून होत नाही. 'चल तू आणि मी मित्र होऊ' असे म्हणून ठरवून मित्र बनत नसतो. सहवासाने परिचय होईल. ओळख होईल. पण मनाच्या तारा जुळतीलच असे नाही. सहवासाने खरी मैत्री होते हे चुकीचे आहे.

प्रसिद्ध लघुनिबंधकार ना. सी. फडके सांगतात की, मैत्री ही स्फुल्लिंगीसारखी आहे. ती केव्हा प्रकट होईल सांगता येणार नाही. एखाद्या क्षणी जुळलेली ही मने वर्षानुवर्षे जुळलेली राहतात. संस्कृत सुभाषितकार सांगतो, 'व्यझने मित्रपरिक्षा । संकटातच मित्राची परीक्षा होते. खरा मित्र कसा ओळखावा ? साधारण जगरहाटी अशी असते की, असतील शिते तर जमतील भूते, जोपर्यंत आपल्याजवळ भरपूर काही आहे तोवर मैत्रीचा, प्रेमाचा देखावा करणारी मंडळी आपल्या भोवताली जमतात. ते आपली खुशामत करतात पण आपल्या पडत्या काळातही जमलेली पाखरे भुर्रकन उडून जातात म्हणूनच मला इथे म्हणावेसे वाटते,

जसे घर असावे घरासारखे
नकोत नुसत्या भिंती
तशी मैत्री असावी मनासारखी
नकोत नुसती नाटकी.

खरा मित्र हा कधीच खुशामत करत नाही. उलट आपण चुकत असलो तर कठोर शब्दांच्या फटकाऱ्याने तो आपल्याला जागे करतो. आपल्या विजयाने, यशाने तो आनंदी होतो. आणि मनापासून तो आपले अभिनंदन करतो. गौरवतो, अडचणीच्या काळात काहीही न सांगता तो मदतीला धावून येतो. त्याबाबत तो परतफेडीची अपेक्षा करत नाही. ना. सी. फडके सांगतात की, आमचे चुकते पाऊल जो फिरवतो आणि जाणारा तोल जो सावरतो तो खरा मित्र होय.

मैत्री असावी
रात्रीत चमकणाऱ्या चांदण्यासारखी
जे रात्रीच्या वाटसरूंना
त्यांची वाट दाखवतात.
मैत्री असावी
निखळ हसण्यासारखी
कि त्या हसण्याने दुःखीतालाही
दुःख विसरता येत.
मैत्री कशी असावी,
या गोष्टीला अंत नाही
कारण मैत्रीनेच माणूस मोहरून जातो.
त्या मोहरण्यानेच ती आनंदी राहते.

मित्र हा कसा असावा ? तर मित्र हा चंद्रासारखा शीतल, कृष्णासारखा नटखट, पृथ्वीसारखा क्षमाशील, सूर्यासारखा तेजस्वी हा असावा अशा मित्र लाभणे आणि त्यापासून मैत्रीचे वैभव लाभणे, यापेक्षा परमभाग्य कोणते ? इंग्रजी भाषेत एक म्हण आहे,

Friend in Need is friend indeed.

– विकास मारुती पाटील
बी. ए. भाग एक

# माझी शाळा

ज्या शाळेत शिकतो मी ताठ ठेवूनी मान ।
बिद्री गावातील ही शाळा जिचा मला अभिमान ।।
या शाळेचा रंग निराळा निराळाच गंध ।
रंग-गंधामध्ये वेगळा एक भावबंध ।
विद्यार्थी आहेत येथील एक,
ओठावरी जरी भिन्न भाषा
या शाळेत जे-जे शिकले ।
उच्च पदांवर ते गेले ।।
स्पर्धेत जिंकायला कोणी येता अजिंक्य हे ठरते
बिद्री परिसरातील प्रतिस्पर्धींनी पुरुन हे उरते ।
ज्या शाळेत आज शिकतो मी तिची फारच ख्याती ।
या शाळेची शिस्तीच्या स्वर्गांशी नाती ।।
नाव आहे शाळेचे माझ्या
'दूधसाखर महाविद्यालय बिद्री'
येथील विद्यार्थी आहेत सर्वगुण संपन्न ।।
ही आवडते मज मनापासून शाळा ।
या शाळेच्या कर्तृत्वानी ।।

– कवडे राजेंद्र ज्ञानदेव
बी. ए. भाग १

# स्वरुप

हे विज्ञानसम मानवा, तू खूप प्रगती केलीस ।
आकाशाला फाडून, आईच्या पोटात सुरा खुपसून
आतडी काढलीस ।।

विश्वरुपी मानवमुर्खा जरी आकाशाला भिडलास
तरीपण फुकटच गाढला गेलास ।
माय-भिक्षा, माय-भिक्षा, हे माय...
मानवा हेच तुझे रुप,
जगामध्ये सर्वश्रेष्ठ समजतोस,
येतानाही-पण जातानाही पंरावलंबी,
हेच तुझे स्वरुप ।
जोखड मानेवर घेऊन झाले नाही पुरे,
भ्रष्टाचारीत राजकारणाचे सुरू केलास
मिरवावयास तुरे ।।१।।

राजकारणानेच भारतभूमी जाळवली,
मीच श्रेष्ठ या जगात, माया-ममता खालवली ।
स्वार्थ हाच भाव रक्तामध्ये खवळला,
पेटून उठला, आड येईल त्याला कापून काढला
आड येईल त्याला कापून काढला... ।।२।।

– मंगेश धुरी
बी.एस्सी भाग १

## साक्षरता

जीवनाच्या रम्य बागेत
शब्दांच्या कोमल वेलीवर
अक्षरांच्या जलाशयात
फुलणारे फूल म्हणजे सावित्रीमाता ।
अज्ञानाच्या अंधारात
ज्ञानाच्या प्रकाशात
लोकांच्या अंतःकरणात
पेटणारी ज्योत म्हणजेच क्रांतिबा ।
आकाशातून कोसळती धारा
वनावनातून वाहतो वारा ।
अशीच आहे ही एक धारा
साक्षरता हा त्याचा किनारा ॥

– कांबळे सुहास परशुराम
बी. एस्सी. भाग १

## जीवन साथी

आयुष्यातील प्रत्येक क्षणी
साथ मजला देशील का ?
सुख दुःखाच्या लाटामध्ये
चिंब तू होशील का ?
प्रगतीच्या वाटेवरती
सारथी तू होशील का ?
यशाच्या शिखरावरती
कळस तू बनशील का ?
विश्वास नसलेल्या दुनियामध्ये
विश्वास मजवर ठेवशील का ?

– खोत अमोल
बी. ए. भाग एक

## धडपड

चांगले पाहावे
चांगले लिहावे
काही ना काही
करत रहावे.
चळवळ करावी,
वळवळ नको
धडपड करावी,
चरफड नको.
खटपट असावी,
वटवट नको
तळमळ असावी,
मळमळ नको.
कुरकूर खपेल
गुरगुर नको
गडबड चालेल
लुडबुड नाही.
गोड गावे
आनंदी रहावे,
कीर्ती करून
अमर व्हावे.

– पाटील संदीप सखाराम
बी. एस्सी. भाग तीन

## व्यसन म्हणजे मृत्यू

अरे जागे व्हा जागे व्हा
संसारातून तुम्ही उठला आहात
व्यसनात तुम्ही बुडाला आहात
थोडे तरी रहा या संसारात ॥१॥

स्टार, गुटखा, माणिकचंद
कराल यांची सोबती
बरबाद करून सोडील
साऱ्या संसाराची घरटी ॥२॥

अरे खाल तुम्ही गुटखा
बसेल आयुष्याला फटका
अखेर आवाज निघेल
मृत्यूस जाऊन भेटा ॥३॥

दारू बाटली जर पडेल पदरी
पदोपदी आयुष्यभर होईल बरबादी
सदा व्हाल जीवनात दरिद्री
घ्या मानवा याची खबरदारी ॥४॥

स्टाईल म्हणून सिगारेट ओढाल
धूर सोडीत चोहिकडे फिराल
कॅन्सरला तुम्ही आमंत्रण द्याल
मृत्यू काळास जवळ कराल ॥५॥

निर्व्यसनी म्हणून जगाल
तर समाजात टिकाल
व्यसनास तुम्ही जवळ कराल
तर आयुष्याला मुकाल ॥६॥

– सचिन हात्रोटे
बी. एस्सी. भाग एक

## मी ही मंत्री झालो

निवडणूक आली म्हणून
म्हटलं बघावं मंत्री बनून
लोक आले भरपूर घरी
विकत घेतले त्यांना पैशांनी ।।

प्रचार चालला जोरात
आश्वासनांची दिली खैरात
घरोघरी पाय लागू लागले
म्हणून ओळखी वाढू लागल्या ।।

लोकांच्या खूप मागण्या होत्या
त्या मला पुऱ्या करायच्या होत्या ।।

निवडणूक संपली निवडून आलो
मतांनी पुरा न्हाऊन निघालो
मंत्री झालो सध्या मी ही
लोकांत माझी इमेज वाढली ।।

लोकांना आता विसरू लागलो
पैसाच पैसा मोजू लागलो
टेबलाखालून पैसे आले
गळ्यात हार हातात तुरे मिळाले ।।

बायकोही माझी सोन्यांनी मढली
आधीपेक्षा सुंदर दिसू लागली
पैशाची हवस वाढू लागली
भ्रष्टाचाराची चटक लागली ।।

समाज सेवेच्या नावाखाली
भाषणे अनेक देऊ लागलो
काही सुचेना म्हणून
लिहून पाठ करू लागलो ।।

राजकारणी मी पक्का झालो
मंत्री झाल्यावर
न सांगता बायकोलाही
जाऊ लागलो कोठ्यावर. ।।

– कु. अर्चना माने (बी.ए. भाग १)

## अखेर जातीपातीचा

ही जात नाही ती जात
सारे करू तिच्यावर मात
घेऊनी मानवतेची साथ
संपवू जातीपातीची वात ।।

सुंदरतेची सुंदर छाया
हृदयामधील दाखिव माया
समानतेचा रच पाया
मग होईल जातीचा ढिसूळ पाया ॥

जातीपातीच्या हृदयामधील
नको ती भेदाभेदी
नको ती खूनखराबी
नष्ट करूया जातीपातीची फांदी ॥

देशप्रेम राष्ट्रभक्ती जागृत जरा करा
देशासाठी सारे एकरूप होऊ चला
जातीपातीला देऊन माती
तिरंगा फडकवू चला ॥

उचलूनी मानवतेचा विडा
संपवू जातीपातीचा तिडा
वाचू समानतेचा पाढा
मिरवू प्रगतीचा धडा ॥

मानवतेला लागलेली जळू
करू तिला सळू की पळू
येणाऱ्यांना येऊ दे कळू
जातीला संपवूनच मागे वळू ॥

– दिपक यशवंत आळवेकर
बी. ए. भाग तीन

## मैत्री

दोन शब्दांच्या वेलीवरती
मैत्री हा अमर शब्द उमलतो
नसतो त्याच्यात स्वार्थाचा गंध
स्नेहाचा प्रेमाचा असतो सुगंध

सगळ्यानाच लाभत नाही सुदैव
ज्यांना लाभत नाही ते त्यांच दुर्दैव
हसणं रुसणं मैत्रीच्या वेलात
त्याचा गोडवाही त्याच फुलात

द्वेषाचा भुंगा कधी गुण गुण करी
पण विश्वासाचं पाखरू असतं
गुण गुण करी...

मैत्रीचं फुलं वर्षानुवर्षे बहरणारं असावं
मात्र ते कधी क्षणात कोमजणारं नसावं.

– कु. सविता सिताराम पाटील
(बी. ए. भाग १)

## मैत्री आपली

अतुट नात्यात गुंतलेली
गुढ बंधनात अडकलेली
मैत्री आपली...
चढाओढीच्या आगीत
कधीही न जळणारी
सुख दुःखाच्या क्षणात
हक्क दाखवणारी
मैत्री आपली....
जीवनाच्या प्रत्येक वळणावर
ती तशीच राहू दे
येणारे नववर्ष तुला
सुख समाधानाचे जाऊ दे...

– अविनाश तराळ (बी.ए.भाग २)

## प्रेमाची गोडी

तुझ्या अप्रतिम प्रेमाची गोडी
आता कडवट वाटते आहे
बदनाम मी जगी सर्व या
पण लाजेपोटी जगतो आहे
वचनात बद्ध असणारे चंद्र तारे
तेजोहिन झालेत आता
पापणीतून डोकावणाऱ्या अश्रूंना
कसे आवरू मी आता ?
चूक तुझी पण शिक्षा मला
अपमानित हे जीवन
वाटते चुंबन घेऊनी दुःखाचे
यावे कवेत मरण.

– बाळासो दत्तात्रय कांबळे
बी. ए. भाग १

## शब्द

शब्द असे यावेत
ओठांनाही कळू नये
भावना अशा फुलाव्यात
मनालाही कळू नयेत.
स्नेह असा असावा
हृदयालाही कळू नये
गीत असे गावे
निसर्गालाही कळू नये.
डोळ्यात अश्रू यावेत
नजरेलाही कळू नये.
प्रिती अशी फुलावी
दोघांनाही कळू नये.

– सतीश पावले
बी. एस्सी. भाग तीन

## जीवनाचा सुर्यास्त

म्हणत असता गेलो मेलो,
जीवन माझे जगुनि गेलो,
अर्धे आयुष्य गेल्यावर,
झोपेतून मी जागा झालो.
बरंच काही मिळवताना,
सारं काही गमावून गेलो,
आजवरचे सारे जीवन,
बेहिशेबी जगून गेलो.
उमेद मी हरणार नाही,
कंबर कसून मी उभा राहीन
कष्ट करून फुलवीन आशा
आयुष्याचा मी हिशेब घेईन.
एकच मागणे देई पण देवा,
तोल माझा न ढळावा
तुझ्या नामस्मरणाबरोबर
माझ्या जीवनाचा सूर्यास्त व्हावा.

– ओंकार घोरपडे
बी. एस्सी. भाग १

## नातं

नातं प्रत्येकाचं जीवाभावाचं
आयुष्याच्या वाटेचं
नातं समुद्राचं लाटांशी,
कळीचं फुलाशी
नातं सूर्याचं गगनाशी
नातं प्रत्येकाचं असतं
आयुष्याच्या सुख दुःखाशी .

कु. कांचन नाईक
बी. ए. भाग १

## अशीच ती एकदा..

अशीच ती एकदा....
माझ्या मागून आली,
दिसायला ती ही माझ्याप्रमाणं,
शांत अबोल अन् प्रेमळ
जशी मैत्रीच्या वेलीसारखी...
मनातलं गुपीत सांगण्यासाठी,
जणू ती मला स्पर्शून जात होती,
हृदयातील नातं जपण्यासाठी,
हळूवार खूप काही सांगून जात होती...
तिच्या अन् माझ्या सहवासाने,
कुणाचीही भिती वाटत नव्हती,
अशी ती माझी प्रतिमा,
सायंकाळचा रवी पाहून,
मनात स्नेहाचं नातं जोडत होती ।'

– युवराज दत्तात्रय गायकवाड
बी. ए. भाग १

## प्रेम कोणावर करावे ?

प्रेम कोणावर करावे ?
आपल्या आई वडिलांवर करावे
आपल्या भावावर करावे
आपल्या गावावर करावे
प्रेम कोणावर करावे ? ॥धृ.॥
निसर्गावर करावे
प्राण्या-पक्षांवर करावे
फुला-फळांवर करावे
प्रेम कोणावर करावे ?
आपल्या देशावर करावे
सैनिकावर करावे
मित्रावर करावे
प्रेम कोणावर ही करावे ॥२॥

– राहूल पाटील (बी.ए. भाग १)

## नोकरी

भरती होती क्लार्कची
पदवी मिळविली होती मास्तरची
अर्ज केला मी देवास स्मरून
पण जागा भरून होत्या ठेवल्या भरून
करायची होती नोकरी खाजगी कंपनीत
नाही येणार म्हणाला मॅनेजर अडचणीत
तू मला अनूभवाचं सर्टीफिकेट दाव
पण मास्तर होऊन सुद्धा अनुभवाचा नाही ठाव
शेवटी कंटाळून बँकेत गेलो
नोकरीसाठी हातापाया पडलो
लाच देताच संचालक मंडळी तयार झाली
पण तोपर्यंत चेअरमनचीच उचलबांगडी झाली !
एकदा काढला शासनाने फतवा
देशातील सर्व बेकारी हटवा
म्हणून नोकरीसाठी पुढाऱ्यांबरोबर फिरलो
पण लबाडात शिरून माणूसपणच हरलो
आशातच म्हटलं उडवावा बार
मुलगी म्हणे नोकरीच जीवनाचं सारं
बघितलं तर तीच सर्व काही खरं हाय
पण न मिळणाऱ्या या नोकरीचं काय ?

– किरणजीत घराळ
बी. एस्सी भाग दोन

## निरोप

आठवण येत असेल तर
कधी तरी येत जा
जाताना मात्र
निरोप माझा घेत जा
वळून बघत जा
म्हणूनच म्हणते तू
कधीतरी येत जा
डोळ्यातील आसवांना
वाट करून देत जा
ओठ्यावरील शब्दांना
स्तब्ध ठेवून जात जा
नजरेतील भाषेला
समजून जरा घेत जा
माझ्या मैत्रीला असाच
प्रतिसाद तू देत जा
प्रतिसाद तू देत जा...

**– कु. सोनल ढेकळे (बी. एस्सी. भाग एक)**

## कविता

पणत्यांचा उजेड आभाळाशी
आणि एक ज्योत मनाशी
निळ्या आठवणींच
आभाळ..
माझ्या मनाच्या
तळाशी...
स्पंदनाच्या तेजाने अवतरली
भगवद्गीता,
जुनी आठवण येता ओठातून,
स्फुरते कविता....

**– संदीप फराकटे**
बी. ए. भाग तीन

## जीवन कसे जगावे

जीवन असे जगावे की, जीवनाचा सर्वांना हेवा वाटावा, एखाद्या अरण्यात वाट चुकावी, विश्रांती घेण्यासाठी झाडाखाली बसावे आणि समोरच विंचू दिसावा, त्याला मारण्यासाठी दगड उचलावा, त्याच दगडाखाली साप निघावा, त्यांना चुकविण्यासाठी पाण्यात पडावे. आच्छादलेल्या वेलीत पडावे, आणि पाण्यात भली मोठी मगर असावी, तिचा वेध घेण्यापूर्वीच एक छोट्या फांदीचा आधार मिळावा, वर येण्याची धडपड करीत असताना, काठावर पाण्याच्या शोधात असणारा वाघ दिसावा, आणि त्याच्या भितीने फांदीवरचा तोल सुटावा, आणि त्या फांदीला असणाऱ्या मधाच्या पोळ्याला धक्का लागावा, आणि मधमाशांनी चावा घ्यावा मध तोंडाने झेलण्याचा प्रयत्न करावा, हाच खरा जीवन जगण्यातला आस्वाद...

**– कुलदिप प्रकाश खोत**

## २१ व्या शतकात

एकविसाव्या शतकाची काय असणार जादू
राजकारणात येणार सगळे संतसाधू
एकविसाव्या शतकात संगणकाचे यंत्र
विद्यार्थ्यांना शिकविणार गणिताचे मंत्र
एकविसाव्या शतकात शोध लागणार नवनवे
घरोघरी लागणार बिनतारेचे दिवे
एकविसाव्या शतकात विज्ञानाची भरारी
सगळीकडे असणार अण्वस्त्राची तयारी.

**– संभाजी मोरे**
(बी.एस्सी - ३)

# मी सांगतो

मी सांगतो तसं तुम्ही प्रेम करायचं
रोज तिला स्वप्नात बघायचं,
तिला जवळ घ्यायचं,
सिटीबसमधून दूरवर फिरायचं,
स्वप्नात गाडीला नाही हं शोधायचं
नाहीतर त्यात पेट्रोल कुणी घालायचं ?
मी सांगतो....
भेटायला तिला बागेत तुम्ही बोलवायचं,
ती म्हणेल चल आईस्क्रीम खायचं,
मग आपणही थोडं शहाणं व्हायचं,
दोन हाफ चहामध्ये तिला खुश करायचं,
मी सांगतो,
तिचा असेल वाढदिवस तेव्हा
उगाचाच उपवास धरायचा
पार्टी देण्या-घेण्याच्या भानगडीत नाही पडायचं
कोलगेटवर मिळालेला फ्रि ब्रश
तिला गिफ्ट म्हणून द्यायचं
मी सांगतो...
आठवड्यातून कधीतरी पिक्चरला जायचं,
लेडीजला तिकिट देतात म्हणून
तिला रांगेत उभं करायचं,
खांद्यावर हात टाकून तिच्याबरोबर
फुकटात पिक्चर बघायचं,
मी सांगतो....
कॅन्टीनवर तिला चहाच्या निमित्तानं बोलवायचं,
तिला चारत-चारत आपणही हादडायचं,
एका मिनिटात येतो म्हणून अर्धा तास लावायचं,
तिनं बिल दिल्याचं समजल्यावर यायचं,
मी सांगतो...
प्रेमात रोखीचा व्यवहार कधीच नाही करायचा,
उधार द्यायचं - उधार घ्यायचं,
मुद्दल द्यायची वेळ आली की,
हळूच पळून जायचं,
मी सांगतो....

– संदिप तुकाराम पाटील
बी. एस्सी भाग एक

# अंत यात्रेतील खंत

काय राव एकदा
भलतंच घडलं
मित्राला माझ्या एक
विचित्र स्वप्न पडलं.
स्वप्नात माझी अंतयात्रा
चालली होती
सारी नाती-गोती.
रडत होती
स्मशान भूमिवर
सर्व तयारी चालू होती
निरोपासाठी सगेसोयरे
उभी होती.
मात्र माझ्या प्रियेस
माझी अंतयात्रा चुकली होती
ही एक माझी
अंतयात्रेतील खंत होती

– संदीप सुतार
बी. ए. भाग दोन

# सांग प्रिये मी पास कसं व्हायचं !

सांग प्रिये मी पास कसं व्हायचं ?
आई बाबांनी काम सांगितलं तर,
माझा अभ्यास आहे म्हणून सांगायचं
अभ्यासाच्या नावाखाली तुझा विचार करत
बसायचं...
मग तूच सांग प्रिये मी पास कसं व्हायचं ?
दादाचा शर्ट अंगात घालायचं
मित्राचं पायतान पायात सारायचं
बंटीची पावडर तोंडाला फासायचं
आणि वर्गात तू आल्यावर तुझ्याकडे
एकसारखे बघत बसायचं..
मग तूच सांग प्रिये मी पास कसं व्हायचं ?
कॉलेजात गेल्यावर तू दिसली नाहीस की
सारं कॉलेज धुंडाळत फिरायचं
तू बघून हासलीस की ते तुझं प्रेम
समजून तुझ्या मागोमाग फिरायचं
आज तुझ्याशी बोलायचं म्हणून मनाशी
पक्क ठरवायचं, पण तू समोर आलीस की
लाजून गप्प बसायचं.
मग तूच सांग प्रिये मी पास कसं व्हायचं ?
कॉलेज सुटल्यावर पळत जाऊन
एस.टी.त जागा पकडायचं
म्हाताऱ्यानं विचारलं तर 'आजोबा' इथं
माझा मित्र बसणार आहे म्हणनू सांगायचं
पण, तू आलीस की तू लांब जाऊन
बसायचं, आणि म्हाताऱ्यानं मला
मनातल्या मनात शिव्या द्यायचं.
मग तूच सांग प्रिये मी पास कसं व्हायचं ?
यातच परीक्षेचे दिवस यायचे
तुझा अभ्यास पूर्ण तू पास व्हायचं
मी मात्र त्याच वर्गात डबल बसायचं
काही दिवसानं मुंबईच्या पोऱ्या बघून तू
लग्न करून जायचं
मी मात्र तुझ्या प्रेमात झुरत बसायचं
मग तूच सांग प्रिये मी पास कसं व्हायचं ?
काही वर्षांनी तू पुन्हा मला कुठेतरी भेटायचं
तुझ्या कडेत एक आणि तुझ्या बाजूला एक
असायंच.
मला बघून तू माझी मामा म्हणून ओळख करून
द्यायचं मी मात्र तुझ्या या नात्याचा अर्थ
शोधत रहायचं.
मग तूच सांग प्रिये मी पास कसं व्हायचं ?
नको रे बाबा ! मला एकतर्फी प्रेम नाही करायचं
कॉलेजात जाऊन शिक्षण घ्यायचं
आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण करायचं
म्हणून सांगतो मित्रांनी एकतर्फी प्रेम नाही
करायचं.

– राज पंदारे
बी.एस्सी. भाग एक

# हे असंच चालायचं

आम्ही तास चुकवून कट्ट्यावरती त्यांच्या टिंगला
करीत बसायचं हे असंच चालायचं ॥१॥
त्यांनी आम्हाला पाहूनही न पाहिल्यासारखं
करायचं हे असंच चालायचं ॥२॥
त्यांच्या एका नजरेच्या होकारावर गावभर आम्ही
कटली रे कटली म्हणत हिंडायचं ।
हे असंच चालायचं ॥३॥
मग कुठलं तरी त्यांना स्थळ यायचं ! त्यांनी
आम्हाला सोडून भर्रकन उडून जायचं ।
हे असचं चालायचं ॥४॥
मग कधीतरी त्यांचं लेकरू आमच्या मांडीवर यायचं
मामा-मामा म्हणत खेळायचं आणि आम्ही
आपल्याच नशिबाला दोष देत नुसतंच
त्यांच्या तोंडाकडं बघत बसायचं.
हे असंच चालायचं ॥५॥

– रानमाळे अनिल आ.
बी. ए. भाग १

# कुणीतरी ....

कुणीतरी असावं..

आपल्याकडे पाहणारं

प्रेमाने नाही तरी रागाने तरी पाहणारे

कुणी तरी असावं

आपल्याकडे पाहून हसणारं

स्तुती नाही तरी टिंगल करून हसणारं

कुणी तरी असावं

आपल्याकडे बोट दाखवणारं

प्रेमाने नाही तरी तिरस्काराने दाखवणारं

कुणी तरी असावं

आपल्याकडे डोळे करून बघणारं

डोळ्याला डोळा भिडवून नाही,

पण रागाने तरी कटाक्ष टाकणारं..

कुणी तरी असावं

आपण जिच्यावर प्रेम करावं

पण तिला प्रेम कळूनही न कळावं

कुणी तरी असावं

जिच्यासाठीआपण रोज आसवे गाळावीत

असं कुणीतरी असावं, तिने

आपल्यासाठी कधीतरी आसवे

गाळावीत.

– सागर बी. दाभाडे

बी. ए. भाग एक

# मन

मानवी मन असंच असत
सगळीकडे वळत असत
आनंदाने हसत असत
दुःखाने रडत बसतं
उत्कर्षाने फुलत असत
अवनतीने झुरत असत
सत्याला जवळ करत
खोट्याला दूर थरकवत
माणसातला माणूस जात असत
सैतानातला राक्षस ओळखत असत
मानानं उंचावत असत
अपमानाने खुरटत जात
मानवी मन असंच असत.

– प्रदिप वाईंगडे

बी. ए. भाग १

# प्रतीक्षा

कविता असली माझी जरी
'शब्द' सारे तुझेच आहेत
सूर असला माझा तरी
'गीत' मात्र तुझेच आहे.... !

हृदय असलं माझं जरी
'स्पंद' सारे तुझेच आहेत.
श्वास असला माझा तरी
'गंध' मात्र तुझाच आहेत..... !

सखे, ओंजळ माझी जरी
आठवणी साऱ्या तुझ्याच आहेत,
गेलीस निघूनी कायमची तरी
'प्रतीक्षा' फक्त तुझीच आहे.

– कु. वैशाली चव्हाण

बी. ए. भाग तीन

# डॉ. आंबेडकर

कधीच ना आटीला त्यांचा तो ज्ञानरुपी झरा,
बदलवूनी टाकीला त्याने आपुला हा समाज सारा !
याच माणसाना त्याने
खरे माणसात आणिले
याच माणसात त्याने
समतेचे बीज हे पेरीले.
वंदन करूया आम्ही त्या महान आंबेडकरा !
बदलवूनी टाकीला....

एक एक खेळ त्याने
खेळीले बुद्धीचे,
सर्वासमोर दहन त्याने
केले त्या मनुस्मृतीचे
आंबेडकर दलित बांधवांसाठी झिजला चंदना सारा
बदलवूनी टाकीला....

करूनिया पाणी त्यांनी
आपुल्या अनमोल रक्ताचे,
सुख ना पाहिले कधी त्याचे
ना आपुल्या स्वतःचे,
लाविला आपुल्या समाजात त्यांनी ज्ञानदिप खरा
बदलवूनी टाकीला...

काढीली त्यांनी अज्ञानाची
अंधश्रद्धेची ही बेडी
लाविली ही शिक्षणाची
आपुल्या बांधवास गोडी
उपकार थोर तुझे ते भीमराव आंबेडकर
बदलवूनी टाकीला....

उच्चवर्णियांना तू दाविलीस
दलितांची भीमरूपी शक्ती
ना कधीच विसरलास
या दलित बांधवांची भक्ती
झाला तो सुज्ञ दोघांत पुणे करार खरा !
बदलवूनी टाकीला....

बदलवूनी आपला आचार
वाचविले प्राण अनमोल,
केला त्यांनी देशाचा विचार
पितामह गांधी बहुमोल
कोटी कोटी प्रणाम माझा या भीम प्रभात करा !
बदलवूनी टाकीला...

**– कु. कांबळे सविता सुभाना**
बी. ए. भाग १

# शिक्षक...

फक्त तीनच अक्षरांचा सुरेख संगम
पण निघतो हृदयाच्या गाभाऱ्यातून
त्यात असतात प्रतिबिंबीत उपदेशाचे डोस,
अन दिसते ज्ञानाचे क्षितिज
याने गाठले जाते यशाचे शिखर
पूर्ण होतात आकांक्षा
आणि उमटतात प्रतिक्रिया
स्वाभाविकपणे.... उत्स्फूर्त...
आणि ही दाद महत्त्वाची.
कारण यातूनच होते समाधान
मग, वाढवू या आपल्यातील शिक्षकप्रेम.

**– प्रकाश पाटील**
बी. ए. भाग तीन

# आर्त साद...

जीव गुदमरुन जातोय गं,
मनाशी माझ्या खेळू नको अशी
मी तुझ्यावर प्रेम करतोय,
मारू नको थाप अशी.
स्वप्नांना माझ्या चुरगळतेस का ?
हृदयाला माझ्या छळून अशी
प्रत्येक वेदनेत माझ्या तूच असतेस,
मग जखमेवर मीठ चोळतेस का अशी ?
बीन तेलाचा स्वतः जळतोय,
तू प्रकाशात राहण्यासाठी,
माझ्या भावनेना पायाखाली तुडवतेस,
तुझ्या स्वार्थी भावनेपोटी.
सुंदर-सुखी आयुष्य मिळते,
ज्याच्या त्याच्या कर्मावरती
तुझा अहंकार घाव करून जातो,
जुन्या जखमेच्या वर्मावरती.
तुझ्यावर विश्वास ठेवला कारण,
प्रेमाची ही रित असते
पण तू विश्वास घातकी आहेस,
असं तर मला वाटलंच नव्हतं.
हसावं तर लोक वेडा समजतील
रडावं तर लोक हळवा समजतील
असं कोणीच नाही का हो ?
जे मला समजून घेतील.
क्षणाक्षणाला जगायचं असल्यास,
क्षणाक्षणाला मरावचं लागतं,
सहवासात हसायचं आणि विरहात रडायचं
असल्यास
कुणावर तरी प्रेम करावचं लागतं.
दैवान ही खेळी खेळली नसती,
नशीबानं मग साथच सोडली नसती
मी तुझ्या दारात येऊन,
प्रेमाची भिक मागितलीच नसती.
प्रेमाविना मी भिकारी आहे,
तिच्याकडे भिक काय मागणार,
हृदय जिचे दगड आहे,
हृदयाला पाझर काय फुटणार.
खोट्या प्रेमाचा देखावा करून
फसवलस माझ्या वेड्या मनाला
खऱ्या प्रेमाच्या वेदना सोसून बघ
'अरुण' आठवेल क्षणाक्षणाला.
स्फुंदणाऱ्या मनाला सांगीन,
आता नाही रडायचे.
डोळा चुकविणाऱ्या हृदयाला सांगीन,
आता नाही बिघडायचं.

– अरुण पाटील
बी. ए. भाग २

# विनोदी कल्पना

इन्कमटॅक्स : सरकारचा कमावता मुलगा
पश्चाताप : पाप धुण्याचा साबण.
पाप : नरकात दाखल होण्याचे बाल्कनी तिकीट
रिबीन : झिपऱ्यांना कैद करण्याची साखळी
लग्न पत्रिका : आहेराची नोटीस
मन : वारंवार चोरी होणारी वस्तू
विवाह संस्था : दोन जीवांचे वेल्डींग करणारे मशीन
मैत्री : एक निस्वार्थी नाते
कप-बशी : पत्नीने फोडावे म्हणून आणलेले काच सामान.

– कु. सुनिता सुरेश तामोत
बी. ए. भाग एक

## मी...

दिव्यासारखा जळलो मी
माझा मलाच छळतो मी
कधी अचानक उगवून जातो
कधी अवेळी ढळतो मी ।
दवांसारखा गळतो
नको तिथे अडखळतो मी,
कधी जाळूनी मीच स्वतःला
राख हवेत उधळतो मी ॥
वाऱ्यावर भिरभिरतो मी
मृगजळावर तरलो मी,
बघता-बघता संपून जातो
तरी जरासा उरतो मी ।
जखमेतून भळभळतो मी
नको त्या क्षणी वळतो मी
समजून घेतो जरी जगाला
मला कधी न कळलो मी ।

– कु. मगदूम नितीन दादू
बी. ए. भाग एक

## प्रेम

शोधायचं नसतं प्रेम, साधायंच असतं
विचारायचं नसतं प्रेम, ओळखायचं असतं.
काव्य समजून घ्यायला हृदयात कळ असावी लागते
प्रिती समजवून घ्यायला हृदयात जखम असावी लागते.
मनातील गुंज सांगायला समोर मनासारखं माणूस असावं लागतं.
इतकंही असून चालत नाही त्या माणसालाही मन असावं लागतं.
मी तुझी तुलना फुलांशी करणार नाही
कारण तुझं हसणं फुलानाही जमणार नाही,
म्हणूनच
तुला प्रथम पाहिले आणि वाटले,
आपलं असं कोणीतरी गवसलं,
आणि वाटलं तू माझी अन् मी तुझा.
सांग केव्हा येतीस घरी चहाला.

– किल्लेदार अवधूत
बी.ए.भाग एक

## कठीण शब्दाचे अर्थ

प्रेम - लग्नानंतर जाणारी वस्तू
मूल - लग्नानंतर येणारी वस्तू
सण - कर्ज काढण्याचा शुभ दिवस
भागीदार - धंदा बुडविण्यास मदत करणारा
तरुण - शील बिघडविण्यास तयार असलेला
कर्ज - परत न करण्याची वस्तू
कीर्ती - वर्तमानपत्रात येणारे फोटो
सौंदर्य - जे आपल्याजवळ आहे, असा गैरसमज कित्येक स्त्रिया करून घेतात.
स्तुती - जी आपण तोंडावर करतो
निंदा - जी आपण पाठीमागे करतो.
पगार - वेळेवर न मिळणारी वस्तू
चहा - दुसऱ्याकडून उकळण्याची वस्तू
दारू - सुरुवातीला चोरून आणि नंतर उघडपणे पिण्याचे पेय.
पाणी - जे सध्या कोणीच पीत नसतात.
पैसा - जो मुर्खाजवळ जास्त प्रमाणात असतो.
घर - बायकोला मधूनमधून भेटण्यासाठी ज्या ठिकाणी आपण जातो.
नर्तकी - शिस्तबद्ध लाथा झाडणारी स्त्री.

– निकाडे अंकुश (बी. एस्सी. भाग एक)

## घाव

कुण्या पावसाची ओल,
माझ्या डोळ्यामध्ये आली,
पापणीच्या काठावर, आठवण रुजलेली
वेदनांचे गाव मोठे,
तिथे सुखाला ना वाव
वाळवंटी वाटेवर, किती सांभाळावा प्राण
पाखरांचे थवे गेले आभाळाच्या पोकळीत,
माळावरील खोऱ्यामध्ये कुणी पेटवावी वात
विसावायला गेले तिथे
माझ्या मनातले भाव
सोसावेच लागतात
तिथे सुद्धा उन्हाचे घाव...

– अतुल भाकरे
बी. एस्सी. भाग दोन

## बा पिऊन आला तवा

बा पिऊन आला तवा
घरभर दंगा झाला
बारकी उठली जाबडतच
म्या म्हटलू मरलू आता
आयनं तर मार खाल्ला
कोपड्यात मुडदा पडला
भाजी भाकर नको म्हटला
मटण मासळी पाहिजे म्हटला
हांथरुणाचा इस्कोट झाला
राकीलच्या दिव्यानं
घरदार पेटवू लागला
बा पिऊन आला तवा....

– वंजारे सागर मानसिंग
(बी.एस्सी भाग तीन)

## जीवनाचा अंत

सांगायला भरपूर आहे
परंतु आतल्या आत
मरतो आहे मी
थकल्यामुळे बंद झालेत डोळे
खरोखर कुठे झोपलो आहे मी
दिवसभर हसून हसून दमलो
परंतु रात्री एकटाच रडलो आहे मी
सर्वांना पाण्यापर्यंत पोहचवून
तहानलेला मागे परतलो आहे मी
जगाला प्रेमाची रीत समजावून
तुला विचारण्याच धाडसं केलं नाही मी
आस थोड थोड मरण्यापेक्षा
कायमचा निघून जाणार आहे मी.

– दत्तात्रय पाटील
बी. ए. भाग तीन

## चारोळ्या

जीवनाचा अर्थ लावणं
खरंच सोपं आहे
जसं काट्यासारखे वाऱ्यावर
फुल डोलत आहे.
जीवन जळताना फूल बनावे
फुलाप्रमाणे सुगंध घ्यावेत
काटे सोबत असतात
असंख्य त्यांना फुले बनवावेत.
आयुष्य चार दिवस आहे
तेही अनिश्चित आहे
प्रेमानं जग जिंकणं
हेच त्याचं अस्तित्वं आहे.

– फराकटे दयानंद सदाशिव
बी. एस्सी. भाग एक

# आमचे गुणवंत


कु.साठे वैशाली तानाजी, बी.ए. भाग 1


कु.पाटील मेघताई रामचंद्र, बी.ए. भाग 1


कु.प्रभावळे सरीता दत्तात्रय, बी.ए. भाग 1


कु.पाटील अमृता दिनकर, बी.ए. भाग 2


कु.पाटील सविता संभाजी, बी.ए. भाग 2


कु.गोते नुतन शिवाजी, बी.ए. भाग 2


पाटील अजित शिवाजी, बी.ए. भाग 3


आगम आनंदा पांडूरंग, बी.ए. भाग 3


सुर्यवंशी सुरेश दत्तात्रय, बी.ए. भाग 3


पाटील सागर बळवंत, बी.एस्सी. भाग 1


पाटील किरण नेमिनाथ, बी.एस्सी. भाग 1


कु. पाटील वैशाली बाळासो, बी.एस्सी. भाग 1

# आमचे गुणवंत



शिंदे प्रशांत पांडूरंग. बी.एस्सी. भाग 2



कु.मोरे संगिता आण्णसो. बी.एस्सी. भाग 2



पाटील विनोद रामचंद्र. बी.एस्सी. भाग 2



भोसले सचिन प्रकाश. बी.एस्सी. भाग 3



जाधव जयदिप सदाशिव. बी.एस्सी. भाग 3



नंणदीकर मयुर धोंडीराम. बी.एस्सी. भाग 3



कु.पाटील अश्विनी तानाजी. बी.एस्सी.भाग3



कु.पाटील सविता संभाजी.
शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता, बी.ए. भाग 2



पाटील तुकाराम शिवाजी.
शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता, बी.ए. भाग 2

कोल्हापूर जिल्हा केमिस्ट्री असोसिएशन आयोजित क्विझ कॉम्पीटीशन मध्ये महाविद्यालयाच्या बीएस्सी भाग ३ च्या संघाने प्रथम क्रमांक संपादन केला

**यशस्वी विद्यार्थी**

१. तुलसीदास हजारे
२. सुनिल पाटील
३. विनोद पाटील
४. निलेश खोत



पाटील सागर बळवंत. बी.एस्सी. 2
बेसीक स्टॅटीस्टीक्स क्वीझ मध्ये
कोल्हापूर जिल्हयात प्रथम



वांदम दत्तात्रय रामचंद. बी.एस्सी. 2
बेसीक स्टॅटीस्टीक्स क्वीझ मध्ये
कोल्हापूर जिल्हयात व्दितीय

# हिंदी विभाग



माँ से मंदिर कहीं न ऊँचा, सबने ही माना ।
माँ के पैरों तले स्वर्ग है, अनुभावियों ने जाना ॥

'कोणार्क'
रामेश्वर दयाल दुबे

● विभागीय संपादक :

**डॉ. देसाई एस्. बी.**

## गद्य


| | | | |
|---|---|---|---|
| १) | कबीर – | सागर चव्हाण | ३९ |
| २) | सूरदास की भक्तिभावना – | संदीप पाटील | ४१ |
| ३) | भूषण – | उषा वळुगडे | ४२ |
| ४) | बिहारी – | महेश पाटील | ४३ |
| ५) | प्रकाश ज्योति – | एकनाथ मस्कर | ४५ |


## पद्य


| | | | |
|---|---|---|---|
| १) | सोच – | अमृता पाटील | ४७ |
| २) | तू ही अब एक सहारा – | सुधाकर कोरवी | ४८ |
| ३) | मेरे ख्वॉब – | आशिष पोवार | ४९ |
| ४) | अजनबी – | कृष्णात चौगले | ४९ |
| ५) | इंतजार – | शहाजी कपले | ४९ |
| ६) | बंधन – | संदीप पाटील | ४९ |
| ७) | दर्द का संदेश – | सुधीर मुळीक | ५० |
| ८) | मुस्कराते ही रहना – | प्रताप पाटील | ५० |
| ९) | क्या चीज है। – | राजेंद्र पाटील | ५० |
| १०) | दोस्ती – | श्रेणीक पाटील | ५१ |
| ११) | माँ – | कु. अबोली सुतार | ५१ |
| १२) | अधुरा प्यार – | कु. सविता घोडके | ५१ |


## अन्य


| | | | |
|---|---|---|---|
| १) | शायरी – | प्रताप पाटील | ४० |
| २) | चारोळी – | राजेंद्र व्हरकट | ४४ |
| ३) | अनमोल वचन (संकलन) – | अमित गोते | ४८ |

# कबीर

संवत १३७५ से संवत १७०० के कालखंड में जो महत्वपूर्ण कवि हुए उनमें कबीर आते है । कबीर भक्तिकाल के प्रमुख कवि है । वे ज्ञानाश्रयी शाखा के कवि है । उनका कृतित्व और व्यक्तित्व देखे बिना उनका गौरव करना कठीण है ।

मध्ययुगीन संत और भक्त कवियों की तरह कबीर का भी जीवन अंधकारमय है । उनके जन्म, मृत्यु, निवासस्थान, वंश के बारे मे कुछ भी यथार्थ रुपसे नही कहा जा सकता । इतना निश्चित है कि वह सिकंदर लोदी के समकालीन थे ।

कबीर ने अपने ग्रंथ मे संत नामदेव का उल्लेख किया है । इसका अर्थ वे नामदेव के बाद हुए । नामदेव का समय १३ वी शताब्दी का अंतिम चरण आता है । संत पिपा मे बडी श्रद्धा से कबीर का नामस्मरण किया है । इससे स्पष्ट है की कबीर पिपा से पहले थे । इसी आधारपर कबीर की जन्मतिथी १४५५ मानी गई है ।

स्वामी रामानंद इनके दिक्षागुरु थे । अंतः साक्ष के आधारपर यह स्पष्ट हो जाता है ।

**''काशी मे हम प्रकट आए रामानंद चेताए ॥''** कुछ विद्वान शेख तकी को कबीर का गुरु मानते है । किंतु अंतःसाक्ष और बहिसाक्ष के आधारपर यह गलत सिद्ध होता है ।

कबीर के जन्मसंबंधी अनेक किवदंतियाँ है । कुछ एक का कहना है काशी मे लहरतारा नामक तालाब है । उस तालाब के निकट कबीर नामक नवजात शिशु को फेका गया था । अतः कहा जाता है की वह फेकने वाली विधवा ब्राह्मणी थी । जिसका बादमे पालनपोषण जुलाहा दांपती नीरू और तीमा ने किया ।

कबीर पंथियोंका मानना है की, अमावस्या की काली रात थी । आकाश मेघोंसे भरा हुआ था । बिजली कौंध रही थी । तभी लहरतारा नामक तालाब मे एक कमल प्रकट हुआ । और फिर वह ज्योति मे परावर्तीत हुआ । और वह ब्रह्म स्वरुप ज्योति ही कबीर है ।

मृत्यु : कहा जाता था की मगहर उनकी तिथी संवत १५७५ मानी जाती है । इस कारण जिवन के अंत मे काशी छोडकर मगहर मे चले गए जहाँ उनका निधन हुआ । उनकी तिथी संवत १५७५ मानी जाती है ।

कबीर परमसंतोषी, उदार, स्वतंत्रता चेता, निर्भिक, सत्यवादी, अहिंसा, सत्य और प्रेम के समर्थक, बाह्याडंभर विरोधी, क्रांतिकारक सुधारक थे । जन्मजात विद्रोही थे । वे मस्तमौला, लापर्वाह एक फक्कड फकीर थे । उनमे एक अहम साहस और अखंड आत्मविश्वास था । वे सिकंदर लोदी के समकालीन थे । वे सिकंदर के सामने झुके नही ।

कबीर गृहस्थी थे । इनकी एक पत्नी थी । जिसका नाम लोई था । कुछ विद्वान इनकी अन्य पत्नि मानते है । जिसका नाम धनिया था । कमान और कमाली उनके पुत्र और पुत्री थे । कबीर का पारिवारिक जीवन सुखी नही था ।

'बीजक' इनकी एकमात्र प्रामाणिक रचना है । इसमें कबीर के उपदेशोंको उनके शिस्योद्वारा संकलित किया गया है । बीधक के तीन भाग है, साखी, सबद, रमैनी.

कबीर के सिद्धान्त -

कबीर तिरस्कारवादी थे । निराकार की प्राप्ती ज्ञान से संभव है । वह घट-घट मे बसता है। उसे बाहर ढुँढने को आवश्यकता नही ।

**घट घट मे सायी रमता,**

**कटूक वचन मत खोले ।**

कबीर एकश्वरवादी थे । किंतु उनका एकेश्वरवाद और मुस्लिम धर्म का एकेश्वरवाद में अंतर है । कबीर का मानना है की, ईश्वर व्यापक है । वह समस्त संसार मे रम रहा है ।

**मो को कहाँ ढूँढे बंदे,**

**मै तो तेरे पास मे ॥**

कबीर ने कर्मकांड, विधि, विधानो और बाह्याचार का विरोध किया है। हिंदू तथा मुस्लिम धर्म मे फैले हुए अनाचार को दूर करने का प्रयास कबीर ने किया है । मुर्तिपूजा कबीर को सर्वथा अमान्य थी । इसकारण वे कहते है की,

**पत्थर पुजे हरि मिले, तो मै पुजू पहार ।**

**ताते वह चक्की भली, पीस खाए संसार ।**

कबीर मुस्लिम धर्म मे फैले हुए अनाचार का भी विरोध करते है । वे कहते है

**कंकर पत्थर जोरी के मस्जिद ली बनाई ।**

**ता चढी मुल्ला बाँग दे बहरा हुआ खुदाई ॥**

भक्ति के मार्ग मे कनक और कामिनी बाधा डालती है । इसकारण कबीर माया से सावधान रहने को कहते है । कबीर की भक्ति ऐसी राजमार्ग है जिसपर सभी सुगमता से चल सकते है । उसमे ऊँच-निच ब्राह्मण-क्षुद्र, स्पृश्य-अस्पृश्य का कोई प्रश्न नही ।

**जाति-पाती पुछे न कोई ।**

**हरि को भले सो हरि का होई ॥**

इसप्रकार कबीर के सिद्धांत के अनुसार यह सिद्ध होता है की कबीर एक महान संत थे ।

- सागर चव्हाण

बी. ए. भाग ३

***

# शायरी

चार फुल काफी है,
आरती उतारने के लिए
हजार फूल काफी है,
दुल्हन सजाने के लिए
एक खुशी काफी है,
गम भुलाने के लिए
लेकिन एक गम काफी है,
जिंदगीभर रुलाने के लिए ।

- प्रताप पाटील

बी. एस्सी. भाग एक

# सूरदास की भक्तिभावना !

अंतःसाक्ष और बर्हिःसाक्ष के आधारपर विद्वानोंने सूरदास की जन्मतिथी संवत १५३५ निश्चित की है । इनका जन्म एक निर्धन सारस्व ब्राह्मण कुल में हुआ यह चतुर्थ पुत्र थे । इनके अतिरिक्त माता-पिता, भाई-बहन आदि का कोई पता नही चलता । यह तो निर्विवाद है कि, सूरदास नेत्रविहीन थे किंतु वे जन्मांध थें, या उनकी आँखे बाद में चली गई कहना बहुतही विवादास्पद है । सुरकाव्य में हुआ 'सूक्ष्म' वर्णन बहुत ही यथार्थ और पारदर्शी है जिसे देखकर यह विश्वास नहीं होता की, वे जन्माध थे, जहाँ सूरदास ने अपने आपको जन्मांध तथा अभागा कहा । कदाचित उन्होंने आत्मग्लानीवश कहा होगा ।

तैतीस वर्ष की आयु में उन्होंने कीर्तन आरंभ किया अंतिम क्षणों तक अर्थात १०५ वर्ष तक वे 'लिलागान' करते रहे इसी आधारपर इनकी मृत्युतिथी संवत १६४० बताई जाती है । सूरदास ने श्रीमत भागवत के आधारपर पदों की रचना की जिसकी संख्या सव्वा लाख बताई जाती है । इन असंख्य पदों को 'सूरसागर' कहा जाता है । किंतु आज सूरसागर के ४-५ हजार पदही प्राप्त होते है । विद्वानों ने अपने खोज और अनुसंधान के आधारपर सूरदास द्वारा रचित २४ ग्रंथो का उल्लेख किया है । इनमें से 'सूरसारावली' 'साहित्य लहरी' आदि उल्लेखनीय है, इन दोनों ग्रंथों की प्रामाणिकता विवादास्पद है । सूरसागर इनकी एकमात्र प्रामाणिक रचना है । यह एक गेयमुक्तक काव्य है । इसमें भगवान की लीलाओं का विस्तारपूर्वक पदों में वर्णन किया है । श्रीमद् भागवत के समान इसमें १२ स्कंद है । यह ग्रंथ भागवत को आधार बनाकर लिखा है । इसलिए इसमें मौलिकता का समावेश हुआ है । इसमें भागवत के अत्यंत प्रेमिका किसी गोपी का उल्लेख कर कर यहाँ प्रेमरस का युक्त-सीक्त प्रयोग किया है । भ्रमरगीत की कल्पना उनकी भक्तिकाल की मौलिक देन है ।

सूर भक्तिक्षेत्र में इतने आगे चले गए थे कि समाज की आवश्यकताओं का उन्हे ध्यान ही नही रहा, वह पहले भक्त थे और बाद में कवि । शुद्ध लीलावादी होने के कारण उनका काव्य स्वातं सुखाय है । इसकारण इनके काव्य में तुलसी की तरह सलोकसंग्रह की भावना ही मिलती वे कृष्ण की रंग में इतना लीन हो गए है कि समाज चाहे नष्ट हो जाए या रहे उन्हे कोई पर्वा नहीं थी । वे सांसरिक जीवन से दूर रहे, कृष्ण के सीवा उन्हें कोई प्रलोभ नहीं था उन्हे तो प्रेम के संकरी गल्ली में कृष्णलीला नंद का खेल खेलना है ।

सूरदास के साम्राज्य में केवल वे और कृष्ण रहे । सूर का अपना छोटासा प्रेम का संसार है, जिसमें वे है, उनका बालगोपाल है, गोप-गोपियाँ, राधा, रास और रंग है । लीला और विहार है, मुरली और तानपुरा है, माखन और दूध है, गाय और बछडे है, यशोदा और नंद है, जहाँ हमेशा आनंद है, विशाद का कोई चिन्ह नहीं, खिन्नता का अभास नहीं ।

– संदीप पाटील

बी. ए. भाग तीन

# भूषण

हिंदी साहित्य के रितिकाल में जो महान कवि हुए उनमे भूषण अपना एक विशेष स्थान रखते है । वस्तूतः भूषण इस युग के पहले वीर रस के कवि है ।

कवि भूषण चिंतामणी और मतीराम के भाई थे । उनका वास्तविक नाम क्या था इस बारें मे निश्चित रूप से कुछ नहा नही जा सकता । भूषण की उपाधि उन्हे चित्रकूट के सोलंकी के राजा रुद्रदेव से प्राप्त हुयी थी । वे कई आश्रयदाताओं के पास रहे । महाराज छत्रसाल और शिवाजी इनको अधिक प्रिय लगे उनका कालखंड संवत १६७० से १७७२ तक माना जाता है ।

ग्रंथ : भूषण के छः ग्रंथ माने जाते है । जिनके नाम निम्न प्रकारसे है ।

१) शिवराज भूषण २) शिव बावणी
३) भूषण उल्हास ४) दुषण उल्हास
५) भूषण हजारा ६) छत्रसाल दशक

इनमें से शिवराज भूषण, शिवबावनी तथा छत्रसाल दशक वीर रस संबंधी छोटे छोटे ग्रंथ है । जिसमें छ शिवाजी छत्रसाल के वीर कृत्यों का गौरवमय गान है ।

भूषण वीर इस के कवि थे । उनमें से दो-चार पद शृंगार के भी मिलते है । किंतू वे गिनती के योग्य नही । वस्तूतः वे वीर रस के उन्नायक और उत्थापक कवि है । इन्होने शिवाजी और छत्रसाल की वीरता को अत्यंत प्रशंसायमय वृत्तियाँ लिखि है । पर उनमे चापलूसी और झूठी खुशामद की गंध तक नही थी । अतः वे आदिकालीन तथा रीतिकालीन आश्रयदाताओं के अतिशयोक्ति पूर्व प्रसंसामय कविता लिखनेवाले कवियों से बहुत उपर उठ जाते है ।

आचार्य रामचंद्र शुक्ल भूषण के बारे मे लिखते है । 'भूषण ने जिन हो नायकों की कृति को अपने वीर काव्य का विषय बनाया वे अन्याय दमन मे तत्पर हिंदू धर्म के रशक दो इतिहास प्रसिद्ध वीर थे । उनके प्रति भक्ति और सम्मान की प्रतिष्ठा हिंदू हृदयमें उस समय भी थी, और आगे भी रहेगी ।

**भूषण के काव्य में राष्ट्रीयता :** आधुनिक युग के कतीपय आलोचक भूषण के साहित्य में जातियता का तथा सांप्रदायिकता की संकिर्ण भावनाओंका आरोप करते है । किंतू उनका यह आरोप पूर्णतः गलत है । क्योंकि, भूषण के कविता में आए हुए वेद, पुराण, हिंदू, तीलक, चोरी, वेद जैसे शब्दों को देखकर उन्हे राष्ट्रीय कवि के सम्मान से वचित नही किया जा सकता । ऐसा करना उनके साथ सरासर अन्याय होगा । भूषण के युग की राष्ट्रीयता आज के युग की राष्ट्रीयता से भिन्न है । भूषण के समय व्यक्ति विशेष द्वारा अधिकृत भूभाग ही राष्ट्र समझा जाता था । अतः भूषण के आश्रयदाता छत्रपति शिवाजी थे । और छ. शिवाजी अधिकार में होनेवाली भूमि उनका राष्ट्र था । अतः इस राष्ट्र के जो शत्रू थे वह औरंगजेब थे । इसिलिए औरंगजेब की निंदा को आज की दृष्टीकोन से देखना गलत होगा । उन्होने जो निंदा की वै वह उस राष्ट्र की दृष्टीसे उचित थी । इस कारण भूषण के कविता में होनेवाली राष्ट्रीयता को संदेह की दृष्टीसे देखना गलत है ।

– कु. उषा बलुगडे
बी. ए. भाग दोन

# बिहारी

हिंदी साहित्य के रितिकाल में बिहारी बडे प्रसिद्ध कवि है । उन्होंने दोहे लिखकर अपना नाम साहित्य जगतपर स्वर्णाक्षरोंसे लिख दिया । संवत १७०० से १९०० तक के इस युग मे जो श्रेष्ठ कवि हुए उनमें बिहारी इसिलिए अपना महत्व रखते है कि क्योंकि उन्होनें केवल दो ही पंक्तियों की कविता लिखी जिसे दोहे कहते है ।

बिहारी के जमस्थान बारेमें तीन मत प्रचलित है । ग्वालियर, वसुआ गोविंदपूर, मथुरा इन तीनों में से उनकी जन्मभूमि कौनसी यह विद्वानो के संशोधन का विषय बना । अधिकतर विद्वानोंने ग्वालियर को ही उनकी जन्मभूमि बाना ।

जीवनवृत्त - बिहारीकी भेट वृंदावन में शहाजान से हुअी । वह उन्हे आग्रा ले गया । शहाजहाँ के पुत्रजन्मोत्सव के उपलक्ष्य में उनके राजाओ को आमंत्रित किया था । जहाँ बिहारी ने अपने काव्य निपूनता का परिचय दिया । बिहारीपर मुग्ध होकर राजाओ ने बिहारी की वार्षिक वृत्ती बाँध दि ।

बिहारी के जीवन से संबंधित एक बडाही दिलचस्प किस्सा है । महाराजा जयसिंग अपनी राणी के प्रेम में बुरी तरह से आसक्त थे । उसे विभक्त करने का कार्य कईयोने किया । किंतु उसमें सफलता नही मिली । बिहारी के केवल एक दोहेने उसकी मोहनिद्रा जागृत कर दी ।

**नहि पराग, नहि मधुर मधु नहि विकास इहीकाल ।**

**अलि कलि ही सो बंध्यो आगे कौन हवाल ।**

राजा को प्रबोध आया उन्होने रिझकर बिहारी को आपना राजदरबारी कवि नियुक्त किया । और एक-एक दोहेपर एक एक अशरफी देने लगे ।

बिहारी एक सजग कलाकार है । उन्होने जीवनमें ७१३ दोहों का एकही ग्रंथ लिखा । वह है 'बिहारी सतसई' पिछले १००० वर्षो से श्रेष्ठ १० ग्रंथो को चूनना चाहे तो उसमें बिहारी सतसूई का नाम आएगा । बिहारी की इस ग्रंथ की किर्ति के बारे में अनेक अनेक समीक्षकों ने गौरवाद्गार व्यक्त किये है । ''उनका प्रत्येक दोहा एक उज्वल रत्न है । उनके दोहे रस की पिचकारियाँ है ।'' सतसई एक ऐसी मीठी रोटी है जिसे जिधर से भी तोडा जाए तो मिठी लगती है । किसीने उनके दोहों के बारेमें लिखा है ।

**सतसईयो के देहेर जो नावक के तीर ।**

**देखन में छोटे लागे घाव करे गंभीर ॥**

बिहारी मूलतः श्रृंगारी कवि है । शृंगार के संयोगपक्ष में जितने रमे है, उतने वियोग पक्ष में नही । वियोगपक्ष के लिए हृदय की जिन सहानभुतियों और द्रवणशिलता की आवश्यकता होती है बिहारी उनसे शून्य है । उनकी वृत्ती अनुराग के मिलन पक्ष में खूब रमी । क्योंकि वे अनुराग के केवि है । संयोग पक्ष की ऐसी स्थिति नही । जो बिहारी की दृष्टीसे बची हो । रूप दर्शन में आकर्षण होता है । रुपके यह वर्णन नायिका के है । इस दृष्टीसे नायक के आकर्षण

का वर्णन स्वाभाविक था । पर बिहारी ने ऐसा नही किया । नायिका ही कवि की दृष्टी बिंदू है । वह रूपवती है आकर्षित होती है । और पिडीत भी होता है । नायिका गुरुजन परिजन से आँख बचाकर दूती को साथ लेकर मिलन के लिए तैयार हो जाती है । एकान्त नायक नायिका का मिलन होता है । वहाँ मदिरापान होता है । थोडी देर झुठी नही-नही करने के पश्चात नायिका मिलन सुख मे लिन हो जाती है ।

उन्होंने नायक नायिका के अनेक दृश्य साकार किए है ।

१) जैसे नायक पतंग उडा रहा है तो पतंग कि छाया की छुने के लिए नायिका दौडती है ।

२) नायिका के गोद से बच्चा लेना चाहता है उस बहाने उसे स्पर्श हो यह उसकी अभिलाषा है ।

३) दीवार में छेद करके दोनो रातभर एकदूसरे के हाथ पकडकर बैठते है ।

४) अपनी एडियाँ उठाकर एक दुसरे का माथा चूमकर भाग जाते है ।

५) मिठी बातों की लालच से नायक की मुरली चुरानेवाली नायिका बडी श्रेष्ठ लगती है ।

**बतरस लालच लाल की मुरली धरी लुकाई ।**

**सोंह करी मोहन हंसी देन कही नटी जाई ॥**

**–महेश पाटील**

बी. ए. भाग दोन

# चारोळी

यार दोस्ती के लिए है ।
दुश्मन के लिए नहीं ।
बादल बरसने के लिए है ।
गरजने के लिए नहीं ।
हम तुम्हारे लिए है सनम
किसी और के लिए नही ।

****

लोग कहते है
जिसे तुम चाहते हो
वो चांद का टुकडा है ।
मगर हम कहते है
जिसे हम चाहते है
चाँद उसका टुकडा है ।

**– व्हरकट राजेंद्र**

बी. एस्सी. भाग दोन

# प्रकाशज्योति

'यत्र नार्यस्तु पूजन्यते रंमते तत्र देवता' वैदिक कालीन मनू की इस उक्ति से यही स्पष्ट होता है कि प्राचीन कालीन भारतीय विचारधारा में नारी को कितान गौरवपूर्ण स्थान प्रदान किया गया था । भारतीय नारियाँ शिक्षित और विदूषी थी । गार्यी, मैत्रयी आदी इसके ज्वलंत उदाहरण है ।

मगर परिस्थिती वैसी नही रही । समाज बदला वैदिक युग के बाद मारी समाज का समाज का इतिहास शनै-शनै पुरुषों के बेडियों, सामाजिक बंधनो में जकडी जानेवारी नारी का इतिहास बन गया । जहाँ नारी को देवी तथा लक्ष्मी के समान पूजा जाता था । वहाँ अब पुरुषों की भोग्य वस्तू समझा जाने लगा । उसके आत्मसन्मान को महत्व नही रहा ।

'नर को कृत शास्त्रों के बंधन है सब नारी ही को लेकर, अपने लिए सुविधाएँ पहले ही कर बैटे गए । नारी पुरुष की अर्धांगिनी ने रहकर गुलाम बन गयी, उसका सारा जीवन पराधीन रह गया ।

'अबला जीवन हाय तुम्हारी यही कहानी ।

आँचल मे है दूध और आँखों मे पानी ।

नारी की इस दयनीय दशा को दूर करने के लिए उनकी पीडा के मिटाने के लिए महाराष्ट्र में एक नारी अवतार बनकर प्रकट हुआी, जिसने स्त्री-शिक्षा के प्रचार हेतू अपनी सक्रिय भूमिका निभायी उसका नाम है - सावित्रीबाई फुले ।

सावित्रीबाई फुले का जन्म सातारा जिले के नायगांव में खडोजी पाटील के कूल में एक महान क्रांतिकारी, समाज सुधारिका और स्त्री मुक्ती प्रणेती के रुप में ३ जनवरी, १८३१ में हुआ । माता-पिता की यह पहली संतान थी । स्वास्थ्य संपन्न, गुणी और परोपकारी माता-पिता का लहू इस नन्हीसी पुत्री में उतरा था । वह जितनी रुपवती थी, उतनी गुणवती भी लेकिन सात आठ साल की हुई, समाज परंपरा के अनुसार सावित्रीजी का ब्याह जोतिराव फुले के साथ हुआ । वह जोतिबा जी के जीवन की सहचारिणी बनी । सहचारिणी का वास्तविक अर्थ सार्थक किया । उस समय जोतिबाजी ने देखा की समाज प्रबोधन करनेवाला पंडित और शास्त्री वर्ग पाखंडी और स्वार्थी है । स्त्री शुद्रां की स्थिती जानवरों से भी बेहतर है । स्त्रियों और शुद्रों के साथ गुलामों की तरह व्यवहार किया जाता है । यह क्यो ? इसका कारण क्या है ? उत्तर मिला 'अविद्या' अध्ययन, अध्यापन और ज्ञान वितरण करनेवाले पंडित, शास्त्री और धर्म पंडित अपने स्वार्थ के लिए उन्हे 'अज्ञानी' रखते है और मुठीभर लोंगो के हित के रक्षा करते है । तब उन्हें एक उपाय सुझा-स्त्री, शुद्रों को शिक्षिते बनाना और उनके अंधकारमय जीवन में विद्या की ज्योति जलाकर ठनके मन का अंधेरा दूर करना । अपने यह विचार लोंगो के सामने व्यक्त करते हुए मराठी में कहाँ,

'विद्या विना माती गयी, माती विना निती गयी

निती विना गती गयी, गती विना वित्त गयी

विरता विना शुद्र खचले, इसके अनर्थ एका अविद्येने केले ।'

The creation of biosphere reserves involved the detailed survey of all the perfect and dynamic natural ecosystem of the world. After identification, these areas are to be brought under man and Biosphere programmes. For meeting these, reserves are directed and controlled in such a way that all the limiting factors of habitats are removed by taking steps such as vigorous antipoaching drive, ilimination of grazing, fire prevention, soil conservation, water management and non interference by the activities. The biosphere reserves set up so far not only aim at protecting and representing ecosystem but also serves as laboratories for evolving alternative models of developments. The ministry provided financial assistance to respective state government for conservation and management of biosphere reserves.

In`India the "Tiger Project" is one of the best success stories of biosphere reserves. The total area of tiger reserves is 15,8000 sq. km. covering about 2.10% of the total forest area. Tiger is a national animal of India It is found in diverse habitats and in different parts of the country, represented by each corner. It occuipes the apex position in the ecosystem and health strength. The dynamism of the ecosystem can be judged by the status and position occupied by the tiger in it. Over the years the over exploitation of the forest areas, reduced the habitat of tiger, leading to a rapid decrease in its population. The toll was further taken by the poachers and hunters. All this rendered Tiger population to a precariously low level. The Indian Board of Wild Life set up a task force for studying the conditions of Tiger population and its status. On the

recommendations of the task force project Tiger was launched in 1973 as a central sector scheme. The World Wildlife Fund is also extending financial and technical help to conserve and improve the natural habitat of the Tiger under different habitat types.

The success of project Tiger has been tremendous and almost all aspects of the objectives have been achieved. Adequate results were obtained by controlling the grazing, fire, water management and habitat improvement. The population of the Tiger in all the reserves has increased to more than double as compared to before Tiger reserves.

"Tiger project" suggested that the future programmes for biosphere reservation is very important in debatable issue. The Earth Summit (1992) identified 27 principles for environmental and social development into 21st century. Together these initiatives are known as Agenda 21. It's importantance is how the general public, business community industry and politicians respond to Agenda 21. One target set in Rio acknowledged the importance of local community, participation, local communities in each participating country were charge with consulting the people they represent to formulate at local Agenda 21 by 1996.

The biosphere reserves will help to keep genetic and species diversity as much as possible, to keep the ecosystems dynamic and self sufficient, to develop sustainable systems and to manage prolong use of non-renewable sources.

Thus, biosphere reserves is an important and urgent need of today for better tommorow.

**- Patil Prashant P.**

B. Sc. III (Botany)

# विक्रम साराभाई एक महान कर्मयोगी (वैज्ञानिक)

आंतरराष्ट्रीय ख्यातनाम कर्मयोगी, सरस्वती साधक भारतीय वैज्ञानिक डॉ. विक्रम अंबालाल साराभाई का जन्म १२ अगस्त १९१९ ई को गुजरात के अहमदाबाद में एक प्रतिष्ठित उद्योगपति के परिवार में हुआ । विक्रम साराभाई बालकाल से ही प्रतिभावान थे । जब उनकी आयु २ वर्ष की थी, तब श्री. रविंद्रनाथ टैगोर ने भविष्यवाणी की थी, कि 'यह बालक बडा होकर बहुत यश प्राप्त करेगा ।' रविंद्रनाथ टैगोर की यह भविष्यवाणी वास्तव में सिद्ध होकर विक्रम साराभाई ने एक महान एवं यशस्वी मनोवैज्ञानिक के रुप में संपूर्ण विश्व में अपने ज्ञान एवं प्रतिमा का प्रकाश फैलाकर किर्ति अर्जित की । विश्व में वह सदैव कास्मिक किरणों और परमाणुशक्ति अनुसंधान के लिए स्मरण किये जाते रहेंगे । विक्रम साराभाई के अबोध मन में बचपन से ही किर्ति प्राप्त करने की लालसा और महत्वकांक्षा विद्यमान थी । विक्रम को बचपन से ही साहसिक कार्य पसंद थे ।

विक्रम के प्रिय विषय विज्ञान और गणित थे । उनकी भौतिकशास्त्र में विशेष अभिरुची थी । उन्होंने बीस वर्ष की आयु में केंब्रिज विश्वविद्यालय लंदन से भौतिकी परीक्षा उत्तीर्ण की थी । द्वितीय विश्वयुद्ध के आरंभ में वे भारत लौट आए । उनका संपर्क सर सी. व्ही. रामन और होमी भाभा से हुआ । उन्होंने अंतरिक्ष के गहराइयों से आनेवाली रहस्यमयी कास्मिक किरणोंपर अनुसंधनकर केंब्रिज विश्वविद्यालय से सन १९४७ में पी. एच्. डी. उपाधि प्राप्त की ।

डॉ. विक्रम साराभाई को ब्रह्मांड तथा सौरमंडल के कई जटील प्रश्नों का प्रायोगिक हल निकालने का श्रेय प्राप्त होता है । कास्मिक किरणों का प्रयोग करने के लिए हिमालय की ऊंची चोटि बहुत अनुकूल सिद्ध होगी, यह उनका सुझाव था । इसके फलस्वरुप भारत सरकारने गुलगर्म में एक वैज्ञानिक किरणोंसे पूर्णतया सुसज्जित प्रयोगशाला स्थापित की ।

डॉ. विक्रम साराभाई ने अपना संपूर्ण जीवन भारत देश में विज्ञान की प्रगति और विकास के लिए समर्पित किया । वह आजन्म एक कर्मयोगी के भाँति सरस्वती के आराधना में संलग्न रहे । उनकी १९७१ ई को त्रिवेंद्रम के राकेट लाँचिक स्टेशन थुंबा में हृदयगति रूक जाने से मृत्यू हुई । वह केवल वैज्ञानिक ही न थे, उन्हे कला, शिक्षा, समाज आदि में रूचि भी थी । अहमदाबाद में उन्होंने लोकविज्ञान केंद्र, नेहरू विकास संस्थान स्थापन किए ।

भारत के विकास में उत्कृष्ट सहयोग के लिए उन्हें कोई राष्ट्रीय एवं आंतरराष्ट्रीय सन्मान प्रदान किए गए । सन १९६२ में डॉ. शांतिस्वरुप भटनागर, ममोरियल एवार्ड, सन १९६६ में पद्मभूषण तथा मरणोत्तर पद्मविभुषण से उन्हें अलंकृत किया गया । ऐसा एक कर्मयोगी भारत को मिला ।

– उत्तम कोरे
बी. ए. भाग तीन

# एड्स : म्हणजे काय?

एड्स हा नवा व असाध्य रोग आहे. या रोगाचे संपूर्ण नांव 'अ‍ॅक्वायर्ड इम्युनो डेफिसिअन्सी सिन्ड्रोम' असे आहे. म्हणजे माणसाची रोगप्रतिकारकशक्ती या रोगात कमी होते व हळूहळू नाहीशी होते. एड्स हा रोग एच.आय.व्ही. या विषाणुमुळे होतो. एड्सच्या रोगाची बाधा झालेली व्यक्ती रोगपिडीत असते. म्हणजे या व्यक्तीला प्रत्यक्ष रोग झालेला असतो. एच.आय.व्ही. विषाणुमुळे ज्याचे रक्त दूषित झाले आहे तो रोगवाहक असतो. त्याच्यामुळे दुसऱ्या निरोगी व्यक्तीला रोग होऊ शकतो.

१९८१ मध्ये एड्स रोगाची लक्षणे अमेरिकेत प्रथमच दिसून आली. १९८३ मध्ये शास्त्रज्ञांना या रोगाचा विषाणू सापडला. भारतामध्ये १९८६ मध्ये एड्सचा पहिला पहिला रोगी सापडला.

**एच.आय.व्ही. विषाणुंचा संसर्ग झालेल्या सर्वच व्यक्ती एड्स होवो न होवो जन्मभर रोगवाहक राहतात.**

**एड्स कसा पसरतो ?**

**एड्स पसरण्याचे तीन मार्ग आहेत.**

१) एड्स विषाणुंचा (एच.आय.व्ही. विषाणुंचा) संसर्ग झालेल्या स्त्री/पुरुष यांच्याशी लैंगिक संबंध ठेवल्यामुळे निरोगी व्यक्तीला या विषाणुची बाधा होऊ शकते. पुरुषाच्या वीर्यातून स्त्रीच्या योगीस्त्रावातून एड्स विषाणुंचा संसर्ग होतो. एड्स विषाणुंच्या संसर्गाची कोणतीच लक्षणे बाह्य जननेंद्रियावर किंवा जनेनेंद्रियाभोवती दिसत नाहीत किंवा इतरही कोणती लक्षणे बऱ्याच काळपर्यंत आढळून येत नाहीत. त्यामुळे एड्स विषाणुचा संसर्ग झालेल्या व्यक्तीला स्वतःलाच संसर्गाची चाहूल लागत नाही व आपण रोगवाहक आहोत या धोक्याची जाणीव होत नाही. त्यामुळे हा भयंकर रोग नकळत व वेगाने फैलावतो.

२) एड्स विषाणुंचा संसर्ग झालेल्या व्यक्तीचे रक्त जर दुसऱ्या व्यक्तीला दिले गेले तर रक्त घेणाऱ्या व्यक्तीला एड्स विषाणुंचा संसर्ग होतो. त्यामुळे रक्त घेण्यापूर्वी ते तपासून घेतले पाहिजे. इंजेक्शन देणाऱ्या सूया निर्जतूक न केल्यास (पूर्णपणे उकळून न घेतल्यास) हा आजार फैलावण्याची शक्यता आहे. तसेच शस्त्रक्रियेच्यावेळी वापरण्यात येणारी धारदार शस्त्रे निर्जतुक न केल्यास (पूर्णपणे उकळून न घेतल्यास) हा आजार होण्याची शक्यता असते.

३) एखाद्या स्त्रीला एड्स विषाणूंचा संसर्ग झाला असेल व अशी स्त्री गरोदर राहीली तर बाळंतपणाचे वेळी आपल्या बाळाला पण ती हा

रोग देऊ शकते.

स्त्री/पुरुष यांचे अनेकविध लैंगिक संबंध असतील तर स्त्रीने गर्भधारणा होऊ देण्यापूर्वी व गर्भधारणा झाल्यानंतर सुद्धा आपल्याला एड्स झाला नाही ना याची चाचणी करून घ्यावी. एड्स विषाणूंची बाधा झाली की नाही हे कळण्यासाठी 'इलायझा' पद्धतीने व 'वेस्टर्न ब्लॉट' या दोन प्रकारांनी तपासणी करता येईल.

**एड्सला भयानक रोग का म्हणायचे ?**

* एड्स हा प्राणघातक रोग आहे.

* एड्स हा रोग बरा करता येईल असे औषध अजून तरी सापडले नाही.

* एड्स या रोगाला प्रतिबंधक लस नाही.

* एड्स झालेल्या व्यक्तीचा मृत्यू अटळ आहे.

आपल्या रक्तातील पांढऱ्या पेशी आपल्या शरीरामध्ये नैसर्गिक प्रतिकारशक्ती निर्माण करतात. त्यामुळे वेळोवेळी आपल्या शरीरामध्ये शिरकाव करणारे बाह्य घटक (जिवाणू/विषाणू) यांचा नाश होतो. त्यामुळे आपण सहजासहजी आजारी पडत नाही. एड्सच्या विषाणुंचा (एच.आय.व्ही.) आपल्या रक्तात प्रवेश झाला तर हे विषाणू रोगप्रतिकारक करणाऱ्या विशेष पांढऱ्या पेशींवरच हल्ला करून त्यांनाच नष्ट करतात. त्यामुळे आपल्या शरीरातील नैसर्गिक रोगप्रतिकार शक्तीच नष्ट होते. मग साधेसुधे आजारही गंभीर स्वरुप धारण करतात व असे आजार बरे होत नाहीत. या जीवघेण्या रोगाची प्रत्यक्ष बाधा होण्यासाठी HIV विषाणूंचा संसर्ग झाल्यापासून एड्स होण्यास आठ ते दहा वर्षाचा कालावधी लागू शकतो.

* एड्सचे विषाणू उघड्यावर असतील तर ते जगत नाहीत. ते क्षणजीवी असतात. रक्त, वीर्य, योनीस्त्राव या माध्यमातच हे विषाणू जगतात व वाढतात.

**एड्स खालील गोष्टीमुळे पसरत नाही.**

* एड्स विषाणूंचा संसर्ग झालेल्या व्यक्तींशी हस्तांदोलन, स्पर्श करणे त्याचे कपडे वापरणे, त्याच्याशी बोलल्यामुळे बरोबर हिंडणे, फिरणे, जेवणे, एकाच ठिकाणी काम करणे यामुळे दुसऱ्या व्यक्तीला एड्सची बाधा होत नाही.

* सार्वजनिक मुताऱ्या, संडास, पोहण्याचे तलाव, डास किंवा माशी किंवा किटक चावल्यामुळे एड्स होत नाही.

* एड्स झालेल्या व्यक्तीच्या खोकण्यामुळे, शिंकरण्यामुळे दुसऱ्या निरोगी व्यक्तीला एड्स होत नाही.

वरील गोष्टींमुळे रोग परसत नाही हे लक्षात आल्यानंतर एड्सची बाधा झालेल्या व्यक्तीला वाळीत टाकण्याची गरज नाही किंवा त्या व्यक्तीला नोकरीवरून/कामावरून काढून टाकण्याची गरज नाही. त्यामुळे त्या व्यक्तीच्या मनावर ताण येतो व घरातले वातावरण बिघडते.

❊ जर समाजाने एड्स विषाणूंचा संसर्ग झालेल्यांना किंवा रोगपिडीतांना झिडकारले तर त्या भितीपोटी अशा व्यक्ती तपासणीसाठी पुढे येणार नाहीत व रोग लपवण्याची वृत्ती वाढेल. त्यातूनच हा रोग समाजात पसरत राहील.

❊ एड्सभोवती असलेले शरम व भीतीचे वातावरण दूर झाले पाहिजे. घर, नातेवाईक, मित्र व समाजाने एड्स पिडितांना सामावून घेतले पाहिजे. त्यांना दिलासा, सहानुभूती व मदत केली पाहिजे.

❊ एड्सचा रोगवाहक किंवा रोगपिडीत व्यक्तींच्या जखमेची मलमपट्टी करताना, तसेच त्याच्यावर शस्त्रक्रिया करताना त्या व्यक्तीच्या रक्ताचा संपर्क स्वतःला होऊ नये म्हणून उपचार करणाऱ्या व्यक्तीनी जरुर ती काळजी घेतल्यास एड्सचा धोका टाळता येईल.

❊ एड्स रोगवाहक किंवा रोगपिडीत व्यक्तीवर उपचार करत असताना वापरलेली वैद्यकीय उपकरणे, इंजेक्शनच्या सुया हे पूर्णपणे निर्जतुक करून वापरल्यास एड्सचा धोका टाळता येईल.

❊ एड्स रोगवाहक किंवा रोगपिडीत मातेपासून तिच्या बाळाला एड्स होण्याचा धोका असतो म्हणून अशा स्त्रीने गर्भधारणा होऊ देण्याचे टाळले पाहिजे.

**एड्स रोग कसा टाळता येईल ?**

❊ एड्सच्या विषाणुंचा संसर्ग हा रोगवाहक किंवा रोगपिडीत व्यक्तीच्या वीर्य व योनीस्त्रावातून होतो. एड्सचा प्रसार प्रामुख्याने लैंगिक संबंधातून होत असल्यामुळे एकापेक्षा अनेक व्यक्तींशी लैंगिक संबंध टाळावेत.

❊ लैंगिक व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींशी (वेश्या) लैंगिक संबंध टाळल्यास एड्स रोग टाळता येईल.

❊ रक्तदान करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या रक्ताशी (इलायझा) चाचणी केली पाहिजे. हे रक्त एड्स विषाणू दूषित नसेल तर रक्तदानासाठी वापरले म्हणजे रक्त घेणाऱ्या व्यक्तीला एड्सचा संसर्ग होण्याचा धोका टाळता येईल.

**– तानाजी साळसकर**
बी. एस्सी. भाग ३

❊❊❊

# 'हळदी-कुंकू कार्यक्रम' अहवाल

दरवर्षीप्रमाणे कॉलेजमध्ये हळदी कुंकू कार्यक्रम घेण्याचे ठरविले. पण ग्रामीण भागातील महिला उत्साहाने कॉलेजमध्ये उपस्थित राहू शकत नाहीत म्हणून यावर्षी कॉलेजने एक नवीन उपक्रम चालू केला. महिलांना कॉलेजमध्ये बोलविण्या-ऐवजी, कॉलेजमधील मुली महिलांपर्यंत पोहचल्या व त्यांच्या गावात जाऊन त्यांना प्रत्यक्ष भेटून त्यांच्यासाठी, त्यांच्याच गावात, त्यांना एकत्र बोलावून एक आगळावेगळा कार्यक्रम करण्याचे ठरविले व या कार्यक्रमास खूपच छान प्रतिसाद मिळाला व आम्ही सर्वसामान्य महिलांना त्यांच्या कलागुणांना वाव मिळवून देण्यासाठी महिलांच्या उखाणे, पारंपरिक गीते, जात्यावरच्या ओव्या असा भरगच्च कार्यक्रम स्पर्धात्मकरित्या पार पाडला. हा कार्यक्रम बोरवडे व बिद्री या दोन गावांमध्ये आमच्या कॉलेजमधील मुली (विद्यार्थिनी) व महिला प्राध्यापिकांनी घेतला. या कार्यक्रमाला महिलांचा छान प्रतिसाद मिळाला. शिवाय आमच्या विद्यार्थिनींनाही खूपच आवडला. 'जूनं ते सोनं' याशिवाय शब्दच नाहीत. म्हणून या स्पर्धामध्ये आम्ही महिलांना नंबर दिले व त्यांना कॉलेजमधील गॅदरिंगच्यावेळी पाहुण्यांच्या हस्ते बक्षिस दिले.

हा कार्य सूत्रबद्ध व्यवस्थित करून नवीन उपक्रम राबविण्यास कॉलेजमधील प्राध्यापिका, कु. खेगडे एस. डी., कु. कांबळे वैशाली एस., कु. कांबळे जे. बी, कु. संकपाळ व कु. भोसले एस. पी. यांनी मदत केली.

# हजेरी विभागाचा अहवाल

आपल्या महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांची दैनंदिन हजेरी घेण्यासाठी हजेरी विभाग स्थापन केलेला आहे. या हजेरी विभागातर्फे महाविद्यालयातील प्रत्येक विषय शिक्षकांना विद्यार्थ्यांची दैनंदिन हजेरी घेण्यासाठी हजेरी पुस्तक दिले जाते व त्यानुसार प्रत्येक विषय शिक्षक आपआपल्या विषयाची हजेरी घेत असतात.

नियमित गैरहजर असलेल्या विद्यार्थ्यांसाठी विषय शिक्षकांकडून नांवे मागवून घेऊन संबंधीत विद्यार्थ्यांच्या पालकांना सदर विद्यार्थी हजर राहणेविषयी कॉलेजतर्फे पत्रे पाठवली जातात.

तसेच जे विद्यार्थी सतत गैरहजर असतात व कॉलेज अंतर्गत घेतल्या परीक्षेला बसत नाही त्यांची नांवे हजेरी विभागातर्फे मा. प्राचार्यांना कळविली जातात. मा. प्राचार्य गैरहजर विद्यार्थ्यांना हजर राहणेसाठी सूचना करतात.

हजेरी विभागातर्फे विद्यार्थ्यांना कॉलेजमध्ये सतत हजर राहण्यासाठी वेळोवेळी नोटीसा काढून विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढवण्यासाठी प्रयत्न केलेले आहेत. हजेरी विभागासाठी मा. प्राचार्य व प्राध्यापकांचे सहकार्य लाभले. त्यांचा मी आभारी आहे.

**- प्रा. जानवे ए. डी.**
हजेरी विभाग प्रमुख

# विविध उपक्रम



दि: १२ जानेवारी २००५ रोजी
बोटिनिकल गार्डन च्या स्थापनेस एक वर्ष पूर्ण झाले
त्या प्रसंगी पहाणी करताना.



प्रजासत्ताक दिनी
ध्वजारोहण करताना
मा आमदार के. पी पाटीलसो



रांगोळी प्रदर्शन

# विविध उपक्रम



हळदी कुंकू दिनानिमित्त
वोरवडे येथील महिलांना मार्गदर्शन
मार्गदर्शिका प्रा. एस. पी. भोसले
अध्यक्षा सौ. शोभाताई फराकटे.



प्र. प्रा. एन. डी. पाटील व स्टुडंट
कौन्सिल सचिव श्री. मयुर पाटील
औषधी वनस्पती प्रदर्शन पाहताना



महाविद्यालय आवारात स्वच्छता
मोहिमेत श्रमदान करताना N.S.S
स्वयंसेवक व प्रकल्प अधिकारी
प्रा. डी. के. शिंदे .

# वनस्पतीशास्त्र विभाग अहवाल

शैक्षणिक वर्ष २००४-२००५ मध्ये वनस्पतीशास्त्र विभागाने विविध उपक्रमाचे आयोजन केले.

१) वनस्पतीशास्त्राची आवड निर्माण व्हावी व आजूबाजूंच्या वनस्पतींची ओळख व्हावी म्हणून बी.एस्सी. भाग तीनच्या विद्यार्थ्यांनी उपक्रमांतर्गत रोज एका वनस्पतीची मांडणी विभागासमोर केली.

२) शिवाजी विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र विभागातर्फे दि. १३।९।२००४ रोजी आयोजित केलेल्या कै. डॉ. जी. व्ही. जोशी स्मरणार्थ निबंध स्पर्धेमध्ये आमच्या विभागातील बी. एस्सी. भाग तीनच्या श्री. प्रशांत पी. पाटील यांनी व कु. अर्चना शामराव करनुरे यांनी निबंध सादर केले. पैकी श्री. प्रशांत पी. पाटील यांच्या निबंधास द्वितीय पारितोषिक मिळाले.

३) दि. १८ नोव्हे. ते १० डिसेंबर २००४ दरम्यान अलिगड (उत्तर प्रदेश) येथे पार पाडलेल्या रिफ्रेशर कोर्समध्ये प्रा. एस. एस. पाटील सहभागी झाले.

४) दि. १२।१।२००५ रोजी 'शास्त्रीय वनस्पती-उद्यानाचे' स्थापनेस एक वर्ष पूर्ण झालेनिमित्त सदर दिवशी वनस्पती उद्यान सर्वांसाठी खुले ठेवण्यात आले.

५) बी. एस्सी. भाग तीनच्या विद्यार्थ्यांच्या मदतीने दि. १२ व १३ जानेवारी २००५ रोजी 'औषधी वनस्पती प्रदर्शन' आयोजित केले. सदर प्रदर्शनाचे उद्घाटन स्टुंडट कौन्सीलचे अध्यक्ष श्री. मयुर पाटील यांच्या हस्ते, मा. प्र.प्राचार्य प्रा. एन. डी. पाटील सरांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. कॉलेजचे विद्यार्थी, माध्य. व उच्च माध्य. विद्यानिकेतनचे विद्यार्थी, सर्व अध्यापक आणि मौनिनगर व ब्रिद्रीच्या ग्रामस्थांनी याचा लाभ घेतला. हे प्रदर्शन चित्रित करून व्हिडीओ सी. डी. च्या स्वरूपात जतन करून ठेवण्यात आले. नुतन अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व संचालक मंडळाच्या अवलोकनार्थ सदर प्रदर्शन दि. २६ जानेवारी २००५ रोजी पुन्हा आयोजित करण्यात आले होते.

६) बी. एस्सी. भाग तीनच्या विद्यार्थ्यांची 'वनस्पती-अभ्यास सहल' महाबळेश्वर येथे दि. १७ ते २१ जानेवारी २००५ दरम्यान आयोजित केली.

७) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे दि. २ फेब्रुवारी २००५ रोजी आयोजित 'द वेटलॅन्डस्' या नॅशनल सेमिनार मध्ये प्रा. डॉ. एस. जी. गायकवाड, डॉ. एस. एस. खोत व कु. व्ही. एस. कांबळे सहभागी झाले. यामध्ये डॉ. एस. एस. खोत यांनी सादर केलेल्या Physiological Response of a Mangrove Avicennia marina (Forsk) Vierh. to temporal changes in edaphic conditions at Navlakhi Port, Gulf of Kutch या शोध निबंधास द्वितीय पारितोषिक मिळाले.

८) दि. १७ ते २० फेब्रुवारी २००५ दरम्यान अंमरावती विद्यापीठ, अमरावती येथे आयोजित Modern trends in plant science with special reference to role of Biodiversity in Conservation' या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये डॉ. एस. एस. खोत यांनी सादर केलेल्या 'Comparative effects of six salts and seawater on seed germination in a coastal sanddune grass Halopurum mucronatum, Stapt.' या शोधनिबंधास young scienst स्पर्धेमध्ये द्वितीय पारितोषिक मिळाले.

## वेळापत्रक समिती

सन २००४-०५ या शैक्षणिक वर्षात वेळापत्रक कमिटीचा अहवाल खालीलप्रमाणे -

१) दि. १५।६।२००४ पासून बी. ए. भाग एक वर्गाचे तात्पुरते वेळापत्रक नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात आले.

२) दि. २०।६।२००४ पासून बी. ए. भाग दोन या वर्गाचे तात्पुरते वेळापत्रक नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात आले.

३) दि. २६।७।२००४ रोजी बी. ए. भाग एक, दोन या वर्गाचे अंतिम वेळापत्रक विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी व विषय शिक्षकांच्या माहिती प्रसिद्ध करण्यात आली.

४) सी.आय.सी. कमिटीसाठी वेळापत्रक तयार करण्यात आले.

वेळापत्रक कमिटीस प्रा. एस. ए. साळोखे, प्रशासकीय कर्मचारी, मा. प्राचार्यसो यांचे सहकार्य मिळाले.

**- अधि. ए. बी. माने**
राज्यशास्त्र विभाग

***

## प्रवेश समिती

सन २००४-०५ या शैक्षणिक वर्षात वेळापत्रक कमिटीचा अहवाल खालीलप्रमाणे -

१) २००४-०५ या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयाच्या बी. ए. भाग एक, दोन, तीन या वर्गात प्रवेश देण्यात आले. कोणत्याही विद्यार्थ्यांना प्रवेशापासून वंचित ठेवण्यात आले नाही.

२) बी. ए. भाग एक, दोन, तीन या वर्गाच्या प्रवेशासाठी प्रत्येक वर्गास, फॉर्म तपासण्यासाठी प्राध्यापक नेमणेत आले.

३) बी. ए. भाग तीन या वर्गाच्या प्रवेश संस्थेमध्ये प्रत्येक विषयास समतोलपणा राखण्यात आला.

४) दोनपेक्षा अधिक गुणपत्रक असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांशी चर्चा करून प्रवेश देण्यात आले.

५) विद्यापीठ अधि नियमानुसार मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला.

खालीलप्रमाणे वर्गवार विद्यार्थ्यांची यादी.

बी. ए. भाग एक - ३२९
बी. ए. भाग दोन - १४१
बी. ए. भाग तीन - १००

प्रवेश कमिटीस मा. प्राचार्य, प्रशासकीय कर्मचारी, बी. ए. भाग एक, प्रा. एन. एम. पाटील, प्रा. एल. एस. करपे, बी. ए. भाग दोन प्रा. ए. आर. माने, प्रा. डॉ. एस. डी. पाटील, बी. ए. भाग तीन प्रा. ए. बी. माने, प्रा. एन. डी. पाटील यांचे सहकार्य लाभले.

- ए. बी. माने
राज्यशास्त्र विभाग

# विद्यार्थी कल्याण फंड व आरोग्य

सन २००४-०५ या कालावधीमध्ये विद्यार्थी कल्याण फंड व आरोग्य समितीचा निमंत्रक म्हणून काम करीत असताना विद्यार्थी कल्याण फंडाचा वापर योग्य प्रकारे होण्यासाठी कमिटी कार्यरत होती. तसेच विद्यार्थ्यांच्या आरोग्याविषयी दुसऱ्या सत्रामध्ये रामकृष्ण आरोग्य सेवा केंद्र, कोल्हापूर यांचेवतीने 'लैंगिक शिक्षण व एड्स प्रबोधन या विषयावर व्याख्यान व स्लाईड शो आयोजन केला. त्यामध्ये तज्ञ म्हणून डॉ. शिवकुमार सोलापूरकर, डॉ. मंजिरी वायचळ, डॉ. शहाजी सावंत तसेच डॉ. मकरंद कांबळे यांनी मार्गदर्शन केले.

सहकार्य - मा. प्र. प्रा.सो एन. डी. पाटील, प्रा. एम. व्ही. टाकळे, प्रा. ए. आर. माने यांचे मिळाले.

**निमंत्रक**

**प्रा. गंगावणे एस. ए.**

***

# ग्रंथालय अहवाल

मानवाच्या व्यक्तिमत्वाकडे सर्वांगिण विकास, सुसंस्कृतपणा, जीवनाकडे पाहण्याची संस्कारक्षमता, तसेच नितिमूल्ये जोपासण्यासाठी मानवी मनाचे 'जडण घडण व्हावे लागते. वैचारिक क्षमता वाढवावी लागते. त्यासाठी चांगल्या व उत्कृष्ट ग्रंथाचे वाचन, मनन व चिंतन करणे हे एकमेव साधन आहे. म्हणून मानवाचे पाय हे सतत ग्रंथालयाकडे ओढत असतात.

राष्ट्रीय स्थरावर विचाराधीन असलेल्या शैक्षणिक बदलत्या धोरणानुसार ग्रंथालय हे संदर्भ ग्रंथाने सुसज्ज असणे आवश्यक आहे. या धोरणाचा आदर बाळगून ग्रंथालय कमिटीने शैक्षणिक २००४ ते २००५ या वर्षी क्रमीक पुस्तकाऐवजी संदर्भ ग्रंथावर खूप भर दिलेला आहे. म्हणून या वर्षी १,१५,०००/- चे वेगवेगळ्या विषयाचे संदर्भग्रंथ खरेदी केले असून ३८०० रु. यांची २० मासिके चालू केलेली आहेत.

जिंदाल ट्रस्ट कडून, सायन्स विभागाकडे २३१ पुस्तके देऊन मोलाची भर टाकली आहे. महाविद्यालयात विद्यार्थी-विद्यार्थिनी व शिक्षक स्टाफ मिळून सुमारे ९०० वाचक ग्रंथालयाचा फायदा घेतात.

ग्रंथालयाचे काम सुखकर व विकासाचे दृष्टीने पाय उचलण्यासाठी संस्थेचे मा. चेअरमनसाहेब, मा. व्हा. चेअरमन, मा. सेक्रेटरी, मा. प्राचार्यसाहेब तसेच ग्रंथालय कमिटी यांचे मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले आहे.

**श्री. ए. टी. वागरे**

ग्रंथपाल

# सांस्कृतिक विभाग अहवाल

शैक्षणिक वर्ष २००४-०५ या कालावधीत सांस्कृतिक विभागामार्फत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी खालील कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

**मिनी गॅदरिंग**

दि. ३०।१०।२००४ रोजी शास्त्र शाखा व कला शाखा या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येकी एक-एक असे स्वतंत्र मिनि गॅदरिंग आयोजित करण्यात आले होते, सदर कार्यक्रमात अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन त्यांच्यातील सुप्त कलागुणांना इतर विद्यार्थ्यांसमोर प्रदर्शित केले.

**शिक्षक दिन**

५ सप्टेंबर या शिक्षक दिनी, शास्त्र व कला शाखेकडील निवडक विद्यार्थ्यांनी शिक्षक दिन सादर केला, या दिवशी सदर विद्यार्थ्यांनी शिक्षकाची भूमिका अत्यंत यशस्वीपणे पार पाडली.

**युवा महोत्सव**

प्रतिवर्षी शिवाजी विद्यापीठा मार्फत घेण्यात येणाऱ्या युवा महोत्सव या सांस्कृतिक स्पर्धेमध्ये आपले महाविद्यालयाचे अनेक विद्यार्थी-विद्यार्थिनी विविध स्पर्धेमध्ये स्पर्धक म्हणून सहभाग घेतला होता, या स्पर्धेमध्ये 'मूकनाट्य' व 'पथनाट्य' या स्पर्धेमध्ये आपल्या महाविद्यालयाला तृतीय क्रमांक प्राप्त झाला, सदर युवा महोत्सव २९।११।०४ ते ३१।११।२००४ या कालावधीत शहाजी कॉलेज, कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता.

**गुणगौरव समारंभ**

दरवर्षीप्रमाणे महाविद्यालयात घेण्यात येणाऱ्या गुणगौरव समारंभामध्ये सांस्कृतिक विभागामार्फत दि. ४।२।०५ रोजी गायन, नृत्य, नकला, मिमिक्री, लघुनाटीका इत्यादी कार्यक्रम सादर करण्यात आले. सदर सांस्कृतिक कार्यक्रमात अनेक विद्यार्थी-विद्यार्थीनीनी यशस्वीपणे सहभाग घेतला होता.

**राष्ट्रगीत व ध्वजगीत**

१५ ऑगस्ट व २६ जानेवारी या महत्वपूर्ण दिवशी सांस्कृतिक विभागामार्फत राष्ट्रगीत व ध्वजगीत सादर करण्यात आले, सदर गीत शास्त्र शाखेकडील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सादर केले. या करिता श्री शहाजी कांबळे व जगन्नाथ कांबळे या महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

वरील सर्व कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी मा. प्र-प्राचार्यसो यांचे मार्गदर्शन व डॉ. एस. डी. पाटील, प्रा. ए. डी. जाणवे, प्रा. डी. एन. पाटील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे बहुमोल सहकार्य लाभले, तसेच अनेक विद्यार्थी-विद्यार्थीनींनी सदर कार्यक्रमात सहभागी होऊन सांस्कृतिक कमिटीस सहकार्य केले.

– प्रा. एस. जी. खानापूरे
सांस्कृतिक विभाग प्रमुख

***

# क्रीडा अहवाल

शैक्षणिक वर्ष २००४-०५ मध्ये महाविद्यालयाने शिवाजी विद्यापीठांतर्गत विभागीय व आंतर विभागीय क्रीडा स्पर्धात सहभाग घेवून उल्लेखनीय यश संपादन केले.

महाविद्यालयाने कुस्ती, खोखो, जिमनास्टिक व्हॉलीवॉल, वास्केट वॉल, ॲथलेटिक्स, क्रिकेट (महिला) इ. स्पर्धात भाग घेतला व यामधून खालील खेळाडूंची निवड विविध पातळीवर झाली.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | आडसुळे अमोल प्रकाश | जिमनास्टिक | वारंगल (आंध्र) |
| २) | यादव संजय दत्तात्रय | जिमनास्टिक | वारंगल (आंध्र) |
| ३) | चौगले युवराज लक्ष्मण | जिमनास्टिक | वारंगल (आंध्र) |
| ४) | कु. ठाणेकर शुभांगी रामचंद्र | जिमनास्टिक | वारंगल (आंध्र) |
| ५) | कु. पाटील निलम बाळासाहेब | क्रिकेट | कराड |
| ६) | बिल्ले जयेश जयप्रकाश | ॲथलेटिक्स | वारणानगर |

महाविद्यालयाने या वर्षी १२ ऑगस्ट २००५ रोजी शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय क्रॉसकंट्री (मुले/मुली) स्पर्धेचे यशस्वी आयोजन केले सदर स्पर्धेत १८८ मुले व ६१ मुली सहभागी झाले होते.

वार्षिक क्रीडा स्पर्धाचे आयोजन केले यामध्ये क्रिकेट, कब्बडी, खोखो, व्हॉलीवॉल, बुध्दीवळ स्पर्धाचे आयोजन केले स्पर्धा अंत्य उत्साह वर्धक वातावरणात पार पडल्या.

वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ दि. ५/२/२००५ रोजी मा. आमदार के. पी. पाटीलसो, अध्यक्ष दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री यांचे अध्यक्षतेखाली मा. अरुण घोडके यांचे हस्ते व मा. नामदेवरावजी भोईटे व सन्माननीय संचालक मंडळ यांचे उपस्थितीत पार पडला.

या कामी संस्था अध्यक्ष मा. आम. के. पी. पाटीलसो, उपाध्यक्ष मा. गणपती फराकटेसो, सर्व संचालक मंडळ, मानद सचिव आर. डी. देसाई, सचिव चौगलेसो, सर्व स्टाफ व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले याबद्दल सर्वांचे आभार.

**एन. डी. पाटील**
शा. शिक्षण संचालक

# पालक मेळावा

वार्षिक प्रथेनुसार या शैक्षणिक वर्षामध्ये दि. ९/१२/२००५ रोजी महाविद्यालयामध्ये पालक मेळावा आयोजीत केला होता.

प्रास्ताविकामध्ये महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी (प्रा. एन. डी. पाटील) महाविद्यालयाची सद्यस्थिती, विकास आराखडा, विद्यापीठाचे शैक्षणिक धोरण व पालकांची वाढणारी जबाबदारी या विषयी सविस्तर निवेदन केले.

पालकांमधून मोठ्या प्रमाणात उलटसुलट चर्चा होऊन. त्यासंबंधीत उद्भवणाऱ्या अडचणीतून मार्ग काढले गेले. सदरच्या मिटींगचे फोटो सेशन, रजिस्ट्रेशन रेकॉर्ड, महाविद्यालयात उपलब्ध आहे.

या स्तुत्य उपक्रमांची अनेक पालकांकडून प्रश्रंसा झाली.

निमंत्रक
प्रा. टाकळे एम्. व्ही.

# विषय मंडळे.

शैक्षणिक वर्ष २००४-०५ मध्ये विषय मंडळाच्या वतीने विद्यार्थ्यांना वेळोवेळी मराठी, हिंदी, इंग्रजी आणि विज्ञान साहित्य निर्मितीविषयी मार्गदर्शन केले गेले. शिवाय शुक्रवार दि. २४।१२।२००४ रोजी काव्यनिर्मिती प्रक्रियेविषयीचे मार्गदर्शन आणि कविसंमेलन घेण्यात आले. प्रमुख मार्गदर्शक म्हणून आपल्या परिसरातील कवी गोविंद पाटील व बाळ पोतदार उपस्थित होते. या कविसंमेलनात आपल्या महाविद्यालयातील १२ विद्यार्थ्यांनी आपल्या स्वरचित कवितांचे वाचन केले.

अशाप्रकारे आमचे विषय मंडळ विविध कार्यक्रमांचे आयोजन करून विद्यार्थ्यांना साहित्यनिर्मितीविषयी सतत प्रोत्साहन देत असते. यासाठी मा. प्राचार्य, संस्था सर्व प्राध्यापक, प्रशासकीय सहकारी व कमिटी सदस्यांचे सहकार्य बहूमोलाचे आहे.

निमंत्रक

**डॉ. एस्. डी. पाटील**

# कला परीक्षा विभाग

शैक्षणिक गुणवत्ता वाढीस लागावी म्हणून २००४-०५ या वर्षात परीक्षा विभागामार्फत मासिक चाचणी, सहामाही, पूर्व परीक्षा घेण्यात आल्या. चाचणी परीक्षा २५ गुणांची, सहामाही ५० गुणांची व पूर्व परीक्षा १०० गुणांची होती.

प्रथम चाचणी परीक्षा २६ जुलै ते ३१ जुलै अखेर घेण्यात आली. द्वितीय चाचणी परीक्षा २५ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट व तृतीय चाचणी परीक्षा २९ सप्टेंबर ते ६ ऑक्टोबर अखेर घेण्यात आली.

सहामाही परीक्षा ३ नोव्हेंबर ते ९ नोव्हेंबर अखेर घेण्यात आली. विद्यापीठ परीक्षेचे स्वरुप लक्षात यावे तसेच विद्यार्थ्यांना लिखाणाची सवय, उत्तरासाठी वेळेची मर्यादा लक्षात यावी या उद्देशाने विद्यापीठ परीक्षेच्या धर्तीवर १०० गुणांची पूर्व परीक्षा १४ फेब्रुवारी ते २३ फेब्रुवारी अखेर घेण्यात आली.

परीक्षा विभागात निमंत्रक म्हणून काम करत असताना माझे सहकारी प्रा. साळोखे एस. ए. व प्रा. पाटील एस. आर. यांचे मोलाचे सहकार्य लाभले. तसेच महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य पाटील एन्. डी. यांची प्रेरणा व सहकार्य मिळाले. त्याच बरोबर माझे कला विभागातील सर्व सहकारी प्राध्यापक, सर्व प्रशासकीय कर्मचारी व श्री. कांबळे विठ्ठल यांच्या सहकार्याला बगल देता येणार नाही.

**डॉ. देसाई एस. बी.**

***

# भित्तीपत्रक व परिसर विकास



स्वातंत्र दिनानिमीत्त भित्तीपत्रकाची पहाणी करताना
चेअरमन मा.दिनकररावजी जाधवसो,
व्हा.चेअरमन मा. बाबासाहेब पाटीलसो,
व सन्माननीय संचालक मंडळ



प्रा.दिघे डी.जी. व डॉ.गायकवाड एस.जी. यांच्या
मार्गदर्शनाखाली चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांच्या श्रमदानातुन
सुशोभित परीसर



प्रजासत्ताक दिनी भित्तीपत्रक चे उद्घाटन करताना
चेअरमन मा.आमदार के.पी. पाटीलसो,
व्हा.चेअरमन मा. गणपतराव फराकटेसो, व
सन्माननीय संचालक मंडळ.



प्रा.दिघे डी.जी. व डॉ.गायकवाड एस.जी. यांच्या
मार्गदर्शनाखाली चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांच्या श्रमदानातुन
मोटर सायकल स्टॅन्ड

# अभिनंदन

## क्रीडा प्राविण्य



पाटील अभिजीत विष्णू
औरंगाबाद येथील जिमनॅस्टीक
स्पर्धेसाठी निवड



आडसुळे अमोल प्रकाश
बी.ए. भाग 2
काकतीया विद्यापीठ
वारंगल (आंध्रप्रदेश) सहभाग



यादव संजय दत्तात्रय
बी.ए. भाग 2
काकतीया विद्यापीठ
वारंगल (आंध्रप्रदेश) सहभाग



चौगले युवराज लक्ष्मण
बी.ए. भाग 2
काकतीया विद्यापीठ
वारंगल (आंध्रप्रदेश) सहभाग



कु. वणेकर शुभांगी रामचंद्र
बी.एस्सी. भाग 2
काकतीया विद्यापीठ
वारंगल (आंध्रप्रदेश) सहभाग



कु. पाटील निलम बाळासाहेब
बी.एस्सी. भाग 2
शिवाजी विद्यापीठ
आंतरविभागीय क्रिकेट स्पर्धेसाठी
निवड (कराड)



बिल्ले जयेश जयप्रकाश
बी.ए. भाग 2
शिवाजी विद्यापीठ
उंचउडी आंतर विभागीय
स्पर्धेसाठी निवड (वारणा)

# वैयक्तिक अहवाल

शैक्षणिक वर्ष २००४-०५ मधील माझा वैयक्तिक अहवाल खालीलप्रमाणे -

१) शनिवार दि. २८।८।२००४ रोजी मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महा. कडेगांव जि. सांगली येथे एकदिवशीय चर्चासत्रास हजर.

२) बुधवार दि. १५।९।२००४ रोजी जैन्याळ ता. कागल गावास भेट.

३) बुधवार दि. २९।९।२००४ रोजी देवचंद महाविद्यालय, अर्जुननगर येथे एक दिवशीय चर्चासत्रात उपस्थित.

४) दि. ११।१०।०४ ते २१।१०।०४ अखेर देवचंद महाविद्यालय, अर्जुनननगर येथे ऑक्टोबर २००४ च्या शिवाजी विद्यापीठ परीक्षेसाठी वरिष्ठ पर्यवेक्षक म्हणून काम पाहिले.

५) बुधवार दि. १५।१२।२००४ रोजी शिवाजी विद्यापीठात एम्. फिलच्या मौखिक परीक्षेसाठी हजर. एम्. फिल मौखिक परीक्षेसाठी परिक्षक म्हणून निवड.

६) रविवार दि. १९।१२।०४ रोजी प्रा. प्रकाश पाटील यांचे अर्जुनवाडा ता. राधानगरी येथे दत्तजयंती निमित्त 'दूरदर्शनचे दुष्परिणाम' या विषयावरील व्याख्यानाचे आयोजन.

७) सोमवार दि. २०।१२।०४ रोजी राधानगरी महा. राधानगरी आयोजित राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत श्रमसंस्कार शिबिरामध्ये पिरळ, ता. राधानगरी येथे 'परखड समाजसुधारक' संत तुकाराम या विषयावर व्याख्यान दिले.

८) रविवार दि. २३।१।०५ रोजी राजर्षि शाहू महा. रुकडी येथे एकदिवशीय चचासत्रास उपस्थिती.

९) शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाच्या वतीने आयोजित तीन दिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्रास उपस्थित. दि. २८ मार्च ते ३० मार्च २००५ अखेर.

– डॉ. एस. डी. पाटील
मराठी विभाग

***

शैक्षणिक वर्ष २००४-०५ या शैक्षणिक वर्षामध्ये वैयक्तिक अहवाल खालीलप्रमाणे.

१) शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर राज्यशास्त्र विभागाच्या वतीने बी. ए. भाग दोन नवीन अभ्यासक्रमासाठी दि. १३।०१।०५ व दि. १४।०१।०५ रोजी कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. त्यामध्ये राज्यशास्त्र विषयाचा अधिव्याख्याता म्हणून सहभाग.

२) शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र परिषदेचे तेरावे (१३ वे) अधिवेशन दि. ३० जानेवारी व ३१ जानेवारी २००५ रोजी सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूड, ता. कागल येथे आयोजित करण्यात आले होते. या परिषदेस मी राज्यशास्त्र विषयाचा अधिव्याख्याता म्हणून सहभाग.

३) दि. १९।१२।२००४ रोजी दत्तजयंती निमित्त मु. पो. अर्जुनवाडा ता. राधानगरी, जि. कोल्हापूर येथे दूरदर्शनवरील दुष्परिणाम या विषयावर व्याख्यान दिले.

– प्रा. ए. बी. माने
राज्यशास्त्र विभाग

***

सुतार अवधुत बाळासो
बी.एससी. भाग २




डवरी सागर म.
बी.एससी. भाग १



फराकटे संदिप आ.
एस. एस. व्ही. ग्रुप
बी.ए. भाग ३



वैशाली चव्हाण
बी.ए. भाग ३



सचिन जयसिंग हात्रोटे
बी.एस्सी. भाग १



युवराज डावरे
बी.ए. भाग १



स्मिता पाटील
बी.ए. भाग १



सचिन जयसिंग हात्रोटे
बी.एस्सी. भाग १



# प्राध्यापक वृंद

सन २००४-२००५

प्रभारी प्राचार्य एन. डी. पाटील एम.पी.एड्.

### शारीरिक शिक्षण संचालक

| | |
|---|---|
| श्री. एन. डी. पाटील (प्र.प्राचार्य) | एम.पी.एड् |

### इंग्रजी

| | |
|---|---|
| श्री. सी. वाय. जाधव | एम.ए. डीटीई |
| श्री. डी. एन. पाटील | एम.ए. |
| श्री. एस. ए. साळोखे | एम.ए.एम.एड. |

### मराठी

| | |
|---|---|
| डॉ. ए. जे. वारके | एम.ए.बी.एड.(सेट)पीएच.डी. |
| डॉ. एस. डी. पाटील | बी.ए.बी.एड.पीएच.डी. |

### हिंदी

| | |
|---|---|
| डॉ. एस. बी. देसाई | एम.ए.पीएच.डी. |
| श्री. डी. जी. दिघे | एम.ए. |

### इतिहास

| | |
|---|---|
| श्री. ए. आर. माने | एम.ए.बी.एड.(सेट) |
| श्री. एस. आर. पाटील | एम.ए. |

### समाजशास्त्र

| | |
|---|---|
| श्री. डी. के. शिंदे | एम.ए.एम.फिल. |
| श्री. ए. डी. जानवे | एम.ए.बी.एड. |

### राज्यशास्त्र

| | |
|---|---|
| श्री. ए. बी. माने | एम.ए. |
| श्री. पी. एस. पाटील | एम.ए. |

### अर्थशास्त्र

| | |
|---|---|
| श्री. एल. एस. करपे | एम.ए. बी.एड.एम.फिल |

### भूगोल

| | |
|---|---|
| श्री. एन. एम. पाटील | एम.ए.(सेट) |

### भौतिकशास्त्र

| | |
|---|---|
| श्री. एच. डी. धायगुडे | एम.एस्सी. |
| डॉ. एस. एन. कुलकर्णी | एम.एस्सी.पीएच.डी. |
| श्री. एम. व्ही. टाकळे | एम.एस्सी. |
| श्री. एस. ए. गंगावणे | एम.एस्सी. |
| श्री. एस. ए. व्हनाळकर | एम.एस्सी. |
| श्री. आर. आर. देसाई | एम.एस्सी. |

### रसायनशास्त्र

| | |
|---|---|
| श्री. एस. एन. झेंडे | एम.एस्सी. |
| श्री. आर. बी. चोपडे | एम.एस्सी. |
| श्री. एस. के. सावंत | एम.एस्सी. |
| श्री. एस. जी. खानापूरे | एम.एस्सी. |
| श्री. के. आर. सनदी | एम.एस्सी. (सेट) |
| श्री. पी. पी. व्हनगुते | एम.एस्सी. |
| श्री. वाय. एम. आरडे | एम.एस्सी. |
| श्री. एम. पी. गुरव | एम.एस्सी. |
| कु. एस. पी. कोराणे | एम.एस्सी. |

### वनस्पतीशास्त्र

| | |
|---|---|
| डॉ. एस. जी गायकवाड | एम.एस्सी.पीएच.डी. |
| श्री. एस. एस. पाटील | एम.एस्सी.एम.फिल. |
| श्री. पी. बी. पाटील | एम.एस्सी. |
| कु. व्ही. एस. कांबळे | एम.एस्सी. |
| डॉ. एस. एस. खोत | एम.एस्सी.पीएच.डी. |
| कु. एस. डी. खेगडे | एम.एस्सी. |

### प्राणीशास्त्र

| | |
|---|---|
| श्री. आर. एस. पाटील | एम.एस्सी. |
| कु. जे. बी. कांबळे | एम.एस्सी. |
| कु. एस. पी. भोसले | एम.एस्सी. |
| श्री. एस. ए. व्हनाळकर | एम.एस्सी. |

### संख्याशास्त्र

| | |
|---|---|
| श्री. वाय. एस. पाटील | एम.एस्सी. |
| श्री. एस. एच. पाटील | एम.एस्सी. |

### गणित

| | |
|---|---|
| श्री. डी. डी. कोमेजवार | एम.एस्सी. |

### ग्रंथपाल

| | |
|---|---|
| श्री. ए. टी. वागरे | एम.ए.बी.लिब. सायन्स |

### अधिक्षक

| | |
|---|---|
| श्री. पी. व्ही. पाटील | एम.कॉम. |

### मुख्यलिपीक

| | |
|---|---|
| श्री. एम. के. भोईटे | बी.कॉम. |

### वरीष्ठ लिपीक

| | |
|---|---|
| श्री. आर. एच. कंकाळ | बी.कॉम. |

### प्रयोगशाळा सहाय्यक

| | |
|---|---|
| श्री. एस. के. पाटील | बी. ए. |

### कनिष्ठ लिपीक

| | |
|---|---|
| श्री. आर. एम. देसाई | बी. ए. |
| श्री. व्ही. डी. तळेकर | एच. एस. सी. |

### ग्रंथालय परिचर

| | |
|---|---|
| श्री. एन. एस. वारके | एम.ए.बी.एड. |
| श्री. एस. टी. जोशी | |
| श्री. जे. डी. कांबळे | |

### प्रयोगशाळा परिचर

श्री. बी. एस. सुतार
श्री. ए. एम. घुगरे-पाटील
श्री. आर. पी. आळवेकर
श्री. एन. व्ही. पाटील
श्री. ए. बी. हावलदार

### शिपाई

श्री. एस. एन. कांबळे
श्री. पी. आर. डाकरे
श्री. एस. आर. गुरव

# क्रीडा उपक्रम



शिवाजी विद्यापीठातंर्गत चार जिल्हयातील महाविद्यालयांची आंतरविभागीय क्रॉस कंट्री स्पर्धा (मुले / मुली )आयोजन २००४ -२००५



दादोजी कोंडदेव पुरस्कार प्राप्त मा पी आय मस्कर यांचा सत्कार करत असतांना मा दिनकररावजी जाधव



वार्षिक क्रीडा स्पर्धेतील एक क्षण २००४-२००५

# श्री दूधगंगा वेदगंगा सहकारी साखर कारखाना लि .बिद्री (मौनीनगर)

ता कागल, जि कोल्हापूर

## आमच्या कारखान्याची ठळक वैशिटये -

१. कारखान्याच्या पहिला ट्रायल सिझन १९६२ - १९६३ साली १२५० मे.टन या प्राथमिक दैनंदिन ऊस गाळप क्षमतेने झाला. सध्याची विस्तारीत गाळप क्षमता ३५०० मे.टन आहे .

२. कारखान्याचे कार्यक्षेत्र राधानगरी,भुदरगड, कागल आणि करवीर या चार तालुक्यातील २१८ गावामध्ये विस्तारीत झालेले असुन सुमारे ३५ कि .मी . परिसरामध्ये कारखान्याचे कार्यक्षेत्र आहे .

३. सन १९९४ व १९९५ च्या गळीत हंगामात मी वसंतदादा साखर संशोधन संस्था पुणे यांनी तांत्रीक कार्यक्षमता प्रस्थापित केले बददल महाराष्ट्र राज्यातील व्दितीय क्रमांकाचे पारीतोषिक देऊन कारखान्यास गौरविले आहे. तसेच याच गळीत हंगामात महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ लि .मुंबई यांनी उत्कृष्ठ तांत्रिक कार्यक्षमता प्रस्थपित केले बद्दल महाराष्ट्र राज्यातील व्दितीय क्रमांकाचे पारीतोषिक देऊन कारखाण्यास गौरविले आहे.

४. मे. वसंतदादा शुगर इन्स्टिटयूट, मांजरी बु., जि .पुणे यांनी आमच्या कारखान्याने महाराष्ट्र राज्यात सर्वाधिक रेडयूसड ओव्हर ऑल रिकव्हरी मिळविल्याबददल सन १९९६ - १९९७ सालचे हंगामासाठी उत्कृष्ठ तांत्रिक कार्यक्षमता व्दितीय क्रमांकाचे पारीतोषिक देउन तर सन १९९८ सालचे हंगामासाठी तांत्रिक कार्यक्षमतेचे महाराष्ट्र राज्यात प्रथम क्रमांकाचे पारीतोषिक देऊन कारखान्यास गौरविले आहे.

५. कारखाना कार्यस्थळावर स्वतःची अर्कशाळा उभारण्याचा कारखान्याचा संकल्प आहे.

६. देशातील तीव्र विज टंचाईवर मात करणेसाठी अंदाजे ३५ कोटी रूपयांचा विज निर्मीतीचा प्रकल्प उभारणेचे कारखान्याचे विचाराधीन आहे .

७. कारखान्याच्या माध्यमातुन कृतीयुक्त सहभागाने दूधगंगा नदीवरील दूधगंगा प्रकल्प व वेदगंगा नदीवरील पाटगाव प्रकल्प पुर्णत्वाचे मार्गावर

८. शासनाच्या सामाजिक कल्याण योजना आणि वेळोवेळी शासनामार्फत राबवणेत येणारे लोकाभिमुख कार्यक्रमामध्ये कारखाना प्रत्यक्ष कृतीयुक्त सहभाग घेत असुन कार्यक्षेत्रातील लोकांचे सर्वांगीन विकासासाठी कटीबध्द आहे.

९. कारखाना कार्यक्षळावर बालवाडी पासुन कला आणि विज्ञान शाखांच्या पदवीपर्यंतचे शिक्षणाची सोय व पदव्यूत्तर अभ्यासक्रम सुरू करणेसाठी कारखाना व्यावस्थापकीय मंडळ प्रयत्नशिल.

१०. केंद्र सरकारचे योजने मधून कारखाना कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादनात वाढ व्हावी म्हणून ऊस विकासाच्या विविध योजना कार्यान्वीत, तसेच अद्यावत तंत्रज्ञानाव्दारे ऊस पिकवण्याच्या दृष्टीने शिबीरे, मेळावे, चर्चासत्रे, प्रात्यक्षिके घेवून तसेच बी-बियाणे,खते,किटकनाशके,औषधे अनुदानावर देवून कारखाना सभासदांना प्रोत्साहित करत आहे.

११. सहकाराचे माध्यमातुन कारखाना कार्यक्षेत्रातील सभासद, उस उत्पादक, सामान्य जनता यांचे सर्वांगिण विकासासाठी कारखाना कटीबध्द .

मा आमदार के पी पाटील
चेअरमन



मा आर डी देसाई
कार्यकारी संचालक

मा गणपराव गुंडू फराकटे
व्हा चेअरमन

सर्व सन्माननीय संचालक मंडळ,सभासद बंधु भगिनी,खातेअधिकारी व सेवक

तार : दुधसाखर,बिद्री
एस टी डी कोड : ०२३२५
फॅक्स : २५४९७२

फोन : २५४९२२ ते २६ बिद्री एक्स्चेज
कोल्हापूर ऑफीस : ०२३१ २२६६१५७८
२२६६२९१९

जोतिर्लींग प्रिंटींग प्रेस,गारगोटी २२०५१९